## प्रकरण तिसरे

## "लिगाड" आणि "खांदेपालट" मधील व्यक्तिरेखा

# प्रकरण तिसरे

## "लिगाड" आणि "खांदेपालट" मधील व्यक्तिरेखा

### प्रास्ताविक :

एखाद्या साहित्यकृतीच्या अभ्यासासाठी त्या साहित्यकृतीची विभागणी कथानकप्रधान आणि व्यक्तिप्रधान या दोन प्रकारात करण्याची पध्दत होती. कादंबरी या वाङ्मय प्रकाराचा आजवरचा विकास पाहिला तर तिचे सुरवातीचे स्वरूप कथानकाच्या गुंतागुंतीकडून व्यक्तिदर्शनाच्या सूक्ष्मतेकडे अधिक झुकलेले दिसते. ह.ना. आपटे, वा.म. जोशी, केतकर इ. लेखकांच्या कादंब-या व्यक्तिप्रधान होत्या. या कादंबरीकारांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखा आणि ना.सी. फडके, वि.स.खांडेकर यांच्या कादंब-यातील व्यक्तिरेखा यांच्यामध्ये विकसनशिलता जाणवते. फडके, खांडेकर युगात व्यक्तिचित्रण कसे करावे याविषयी तंत्रे रूढ झाली.

कादंबरीत व्यक्तिचित्रण कसे असावे याविषयी तंत्रे रूढ झाल्यावर पात्रांचे साचे बनत गेले. व्यक्तिचित्रण ठसठशीत व उठावदार झाले पाहिजे याच कल्पनेतून एकाच रंगाने रंगविलेली साचेबंद पात्रे कादंबरीत येऊ लागली. फडके, खांडेकर, माडखोलकर यांच्या पात्रचित्रणाविषयी नरहर कुरुंदकर म्हणतात, "केस, नाक, डोळे असा फडके यांचा खास प्रांत आहे. ..... गळयाच्या खाली पोट-यापर्यंतचे क्षेत्र खास माडखोलकरांचे आहे. या सर्व नारीदेह वर्णनात फक्त आवयवांचे उल्लेख असतात. यापेक्षा काही नसते." [१]

कुरुंदकरांच्या या विधानातून आपल्या समोर व्यक्तिचित्रणाचा साचेबंदपणा येतो. बाहयरूप वर्णन किंवा देहाचे वर्णन यातच व्यक्तिचित्रण अडकले होते. पण नंतरच्या कालावधीत व्यक्तिचित्रणाच्या संकल्पना बदलत गेलेल्या आढळतात. कादंबरीतील व्यक्तिरेखा ह्या स्थिर नसून विकसनशिल राहिल्या

पाहिजेत असा आग्रह नंतरच्या काळात रूढ झाला. त्यानुसार कादंबरीतील व्यक्तिरेखा अधिकाधिक विकसनशिल ठेवण्याचे प्रयत्न कादंबरीकार करू लागले. कादंबरीचा रूपविचार या काळातच अधिक गांभियाने केला जाऊ लागला. त्यामुळे व्यक्तिचित्रण कादंबरीचा महत्त्वाचा घटक आहे ही संकल्पना रूढ व स्थिर होत गेली. कादंबरीतील व्यक्तिरेखा जितक्या विकसनशिल व जीवंत असतील तितके जीवनदर्शन वास्तवपूर्ण होत गेले.

कादंबरीतील व्यक्तिचित्रणाबाबत वेगवेगळया भूमिका टीकाकारानी घेतलेल्या दिसतात. सामान्यपणे वास्तवाभिमुख कादंबरीकार आपल्या पात्राशी तटस्थतेचे नाते ठेवतो. अशी एक भूमिका असून दुसरी भूमिका लेखक आपल्या जीवनदृष्टीनुसार पात्रांची निर्मिती करतो असे माननारी दिसते.

कादंबरीकाराने आपल्या पात्राशी तटस्थपणाचे नाते ठेवावे याचा अर्थ त्यांच्या भावना, त्यांच्या आकांक्षा आणि त्यांची वृत्ती-प्रवृत्ती यांच्याशी समरस होण्याची परकाया प्रवेश सिध्दी बाजूला ठेवावी, व थंडपणाने केवळ पात्रांच्या हालचालीचा मागोवा घ्यावा असा असल्याचे दिसत नाही. तर पात्रांचे वर्णन समरसून आपणच पात्र आहोत अशा भूमिकेतून पात्रचित्रण होऊ नये अशी अपेक्षा दिसते. तर दुस-या भूमिकेत लेखक आपल्या आशयाच्या गरजेनुसार पात्रांची निर्मिती करीत असतो. ही पात्रे आशयानुरूप वास्तव करण्याचा प्रयत्न असतो.

व्यक्तिचित्रण हा कादंबरीचा महत्त्वाचा घटक आहे. कादंबरीतील व्यक्तिरेखा जितक्या विकसनशिल असतील तितके कादंबरीचे यश मोठे असते. व्यक्तिचित्रणाबरोबर कथानक, मनोविश्लेषण, वातावरण हे घटकही महत्वाचे आहेत. या घटकामुळेही कादंबरीला यश प्राप्त होते.

मानवी जीवनाचे आकलन कादंबरीकार कादंबरीत मांडत असल्यामुळे त्याला पात्रांच्या सहाय्याने हे आकलन मांडावे लागले. कादंबरीकार आपल्याला

जो आशय मांडावयाचा आहे, त्यासाठी आपल्यास उपयुक्त अशी पात्रे निर्माण करतो. या पात्रांच्याद्वारे लेखक मानवी जीवनातील ज्या असंख्य घडामोडी सतत होत असतात त्यांचे दर्शन वाचकास घडवत असतो. याबाबत बापट, गोडबोले म्हणतात की, "उच्च कलेल्या दृष्टीने कथानकातील चातुर्यापेक्षा कुशल व्यक्तिदर्शनाच्या शोभेने सजलेल्या कादंबरीसच श्रेष्ठ स्थान मिळेल." २

बापट, गोडबोले यांच्या या विधानातून असे स्पष्ट होते की कादंबरीकार आपल्या प्रतिमेच्या सहाय्याने आपल्या पात्रांचे अंत:करण उघडे करुन दाखवितात. बाह्य सृष्टीतील विविध वस्तूंच्या दर्शनापेक्षा मानवी अंत:करणात चालेलेल्या घडामोडी महत्त्वाच्या असतात. लेखक आपल्या कौशल्याने मानवी अंत:करणातील घडामोडीचे दर्शन कादंबरीत घडवतो त्यावेळी कादंबरीला महत्व प्राप्त होते.

"कादंबरीतील पात्रे प्रथम लेखकाच्या कल्पनेत आकाराला येतात. त्यानंतर कथानकाची जुळणी होत असते. पात्रांची निर्मिती लेखकाच्या मनातील हेतूनुरुप होत होत असते. याचा अर्थ लेखक पात्रांची निर्मिती हेतूपूर्वक करत असतो. आणि आपल्याला अभिव्यक्त करावयाचा आशय त्यांच्या माध्यमातून अभिव्यक्त करत असतो."[3]

कादंबरीतील व्यक्तिरेखाना स्वतंत्र मूल्य असते. या व्यक्तिरेखाच कादंबरीची घडण करु शकतात. याबाबत डॉ. बांदिवडेकर म्हणतात की, "जे जीवन कादंबरीत रंगविलेले असते, त्यानुसार गौण पात्रांचे अथवा प्रमुख पात्रांचे व्यक्तिदर्शन घडविलेले असते. कादंबरीतील पात्रे वास्तव व जीवंत असावीत व त्यांचे वागणे त्यांच्या स्वभावाशी सुसंगत असावे. वाचकासमोर ती मूर्तिमंत साकार व्हावीत एवढीच अपेक्षा त्यात असते."४

कादंबरीतील व्यक्तिरेखा जीवंत साकार करण्यासाठी त्या व्यक्तिरेखांचा स्वभाव वागणे यातून त्या पात्रांचे जीवन साकार व्हावे लागते. निवेदन, पात्र, संवाद यांच्या माध्यमातून लेखक कादंबरीत व्यक्तिदर्शन घडवत असतो. हे व्यक्ति-दर्शन विशिष्ट गुणधर्माचे प्रतिक नसते. तर सभोवती वावरत असलेल्या माण-साच्या स्वभावाचा परिचय करुन देणारे असते. याबाबत बापट, गोडबोले म्हणतात की, "कादंबरीतील पात्रे काल्पनिक खरी पण त्यांच्यात जिवंतपणा येण्यासाठी त्यांना देव किंवा दानव कोटीतील करण्याऐवजी मानवकोटीतील करणेच जरूर आहे." [५]

स्वाभाविकपणे कादंबरीकाराला अशी पात्रे निर्माण करण्यासाठी सभो-वतालच्या सृष्टीचे मार्मिक निरिक्षण करणे आवश्यक असते. कादंबरीतील व्यक्तिचित्रण ही बाहय सृष्टीतील नमूने असतात. लेखक आपल्या प्रतिभाशक्तीने अशा व्यक्ती निर्माण करीत असतो.

कादंबरीचे निवेदन, पात्रांचे स्वभाव,संवादाची भाषाशैली या घटनामुळेच पात्राला जीवंतपणा येत असतो. कादंबरीतील सर्व पात्रे सारखी असतात असे नाही. काही पात्रांना कादंबरीच्या मध्यभागी लेखकाने कल्पिलेले असते. तर काही पात्रे मध्यवर्ती पात्रांना उठावदार करण्यासाठी निर्मिलेली असतात. यांचे वर्गीकरण "ई.एम्.फॉस्टर यानी स्थिर (flat ) आणि विकासी (Round) असे पात्रांचे दोन वर्ग कल्पिले आहेत."[६]

मराठी कादंबरीत प्रारंभी स्थिरप्रकृती पात्रे निर्माण करण्याकडेच लेखकाची प्रवृत्ती अधिक होती. फॉस्टर साहेबांचे हे वर्गीकरण मराठी कादंबरीतील व्यक्ति चित्रणाला तंतोतंत उपयोगी पडेल असे नाही. कारण मराठी कादंबरीतील आशयद्रव्य जसे बदलत गेले तसे पात्रांचे स्वभावचित्रणही बदलत असल्याचे आपणाला दिसते. कारण विकासी पात्रे क्रिया-प्रतिक्रिया व्यक्त करण्यात कलाविलासाला अधिक वाव मिळतो. याची जाणिव लेखकाला झाली व विकासी पात्रे निर्माण

करण्याकडे त्यांचा कल दिसू लागला.

कादंबरीतील व्यक्तिदर्शन जितके वास्तव असते तीतकी कादंबरीस कलात्मकता प्राप्त होते. पात्रांत जिवंतपणा असेल तर ती वास्तव होतात. कादंबरीतील पात्रांच्या जिवंतपणाविषयी बापट, गोडबोले म्हणतात की, "ललित वाङ्मयातील सर्व जीवंत पात्रे प्रत्यक्षाचा अर्क काढून तयार केलेले नमूने आहेत. ते प्रतिमा नसून प्रतिमाने आहेत व म्हणूनच ती जीवंत आहेत."[७]

कादंबरीसृष्टी ही प्रत्यक्ष सृष्टीतील विविध अनुभवांच्या पायावर उभारलेली सृष्टी असते. एकवेळ प्रत्यक्ष सृष्टीतील माणसांत विसंगती आढळेल व त्यांचे वर्तनही पुष्कळदा वेगळे वाटेल पण कल्पित सृष्टीतील पात्रे ही प्रत्यक्षातील स्त्री-पुरुषाच्या गाळीव नमुन्यासारखी आहेत. कादंबरीचा दर्जा ठरविण्यासाठी त्या कादंबरीतील पात्रांचा जिवंतपणा पाहिला जातो. कादंबरीतील पात्रांत जिवंतपणा आणण्यासाठी लेखकाला सभोवतालच्या सृष्टीचे अवलोकन व आकलन करणे आवश्यक असते.

मोहन पाटील यांच्या "लिगाड" आणि "खांदेपालट" या लघुकादंब-यातील व्यक्तिरेखांचा अभ्यास या प्रकरणात करावयाचा आहे. या व्यक्तिरेखा बदलत्या ग्रामीण वास्तवातून आलेल्या आणि ग्रामीण वास्तवाशी अतूट संबंध दाखविणा-या आहेत. त्यामुळेच त्या जीवंत वाटतात. व्यक्तिंचे आपआपसातील संबंध त्यांच्या जगण्यातील वेगळेपण आणि सगळ्याना जीवंतपणा आणणारी मानवी स्वभावातील गुंतागुंत ही पाटील यांच्या व्यक्तिचित्रणाची महत्वाची वैशिष्टये आहेत.

पाटील यांच्या कादंबरीत बदलत्या ग्रामीण जीवनाचे चित्रण येते. या बदलत्या ग्रामीण जीवनात मानवी स्वभावाचे विविध नमुने, त्यांची वृत्ती, प्रवृत्ती व वागण्याच्या विविध त-हा दिसून येतात. म्हणून या व्यक्तिरेखांचा सखोल परामर्श येथे घ्यावयाचा आहे.

मोहन पाटील यांच्या "लिगाड" आणि "खांदेपालट" या दोन्ही लघुकादंबरीतून येणाऱ्या पात्रांची संख्या ३० आहे. यातील प्रमुख व्यक्तिरेखा १५ आहेत. या प्रमुख व्यक्तिरेखाना उठावदार करण्यासाठी व कथानकाच्या आशयाला परिपूर्णता आणण्यासाठी या १५ व्यक्तिरेखा आल्या आहेत.

अभ्यासाच्या सोयीसाठी या व्यक्तिरेखांचे खालील प्रकारे वर्गीकरण केले आहे.

१) दुभंगलेल्या व्यक्तिरेखा
२) महत्त्वाच्या व्यक्तिरेखा
३) स्त्री व्यक्तिरेखा
४) सामान्य माणसांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तिरेखा
५) इतर व्यक्तिरेखा

अभ्यासाच्या सोयीसाठी हे वर्गीकरण केले आहे. या वर्गीकरणानुसार व्यक्तिचित्रणांचे स्वरूप समजावून घ्यावयाचे ठरविले आहे.

१.१ <u>दुभंगलेल्या व्यक्तिरेखा</u> :

मोहन पाटील यांच्या कादंबऱ्यात दुभंगलेल्या व्यक्तिमत्वाच्या काही व्यक्तिरेखा आल्या आहेत. रूढ, पारंपरिक चाकोरीतून मोहन पाटील यांच्या व्यक्तिचित्रणाचा अभ्यास करता येत नाही. सुष्ट × दुष्ट ही प्राचीन पध्दती आजच्या नव्या जीवनात आढळत नाही. खल परिस्थिती व खलपुरुष यासंबंधीचे जुने संकेत आता बदलत आहेत. याबाबत बापट, गोडबोले म्हणतात, "खल-पुरुषाला निर्माण करण्याऐवजी विरोधी परिस्थितीकडून खलनायकाचे काम करवून घेण्याचीही पध्दत आहे. एखादी व्यक्ती नसून विरोधी परिस्थिती बरोबरच त्यांचा संग्राम होत असतो." [८]

परिस्थितीविरोधी झगडा निर्माण झाल्यावर व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाला दुभंगलेपण प्राप्त होते. ग्रामीण जीवनाचे चित्रण करताना आजच्या

बदलत्या ग्रामीण जीवनात माणूस दुभंगलेला आढळतो. माणसाचे हे दुभंगलेपण मोहन पाटलांच्या कादंबरीचे एक विशेष आहे.

१) दाजीतात्या :

दाजीतात्या हे "लिगाड" कादंबरीतील प्रमुख पात्र आहे. त्यांच्या वागण्यातून लेखक ग्रामीण भागातील खलप्रवृत्तीचे दर्शन घडवतात. दाजीतात्याचे बाह्यवर्णन करताना लेखक म्हणतात, "नेहरू शर्ट, जाकीट, खादीचं धोतर, डोकीवर कडक कोनाची टोपी, ओठावर मिशांचा झुबका असा त्यांचा वेश." (लिगाड पृ. ३३).

बाह्य वेशावरून तात्या सत्पुरुषासारखे सभ्यगृहस्थ दिसतात. हे तात्यांचे दाखवायचे दात आहेत. परंतु खायचे दात वेगळेच आहेत. तात्यांचे वागणे म्हणजे वरवर दिसणारा पुढारीपणाचा साळसुदपणा. परंतु आतून साऱ्या भानगडी. दाजीतात्यांच्या स्वभावाचे वर्णन करताना लेखक म्हणतात की,

"दाजी तात्यांचा स्वभाव म्हणजे प्रत्येकाचे पायात पायखूट अडकवूनं तो रिकामा. तात्यां म्हणजे गावातला किडका साप. डिवचलं की फोडणार. म्हणून प्रत्येकजन त्यांना घाबरून असत. (लिगाड, पृ. २७)

या वर्णनानुसार दाजीतात्यांच्या स्वभावाचा विशेष जाणवतो. तात्यांना विरोध करणाऱ्या माणसाच्या मागे तात्या काहितरी लिगाड लावून देतात. लोकाना अडचणीत आणतात. असा तात्यांचा स्वभाव. या वर्णनातून स्पष्ट होतो.

तात्या गावचे सरपंच असतात. पाणी सोसायटीचे चेअरमनही असतात. साखरकारखान्यात त्यांचा वशिला असतो. तात्यांची भरपूर बागायती शेती आहे. तसेच त्यांची वृत्ती सरजांमशाही आहे. यामुळे सत्ता, संपत्तीचे केंद्रीकरण तात्याजवळ झालेले आहे. याचा फायदा घेऊन तात्या गावातील

शेतक-यांची पिके पाण्याअभावी जळू लागतात. परंतु हा सत्तेच्या जोरावर पाटाचे पाणी स्वत:च्या विहिरीत सोडतो. तात्यांच्या मनमानी वागण्याविषयी सांगताना लेखक म्हणतात की,

"सगळ्या गावाच्या उरावर बसून हयो एक्टा मलिदा खात बसलेला. बाकी चिल्लर माणसं. डोळं झाकून उगं सोसत. काय करत्यात ? सोसायटीचा चेअरमन, गांडीबुडी पैसा, वरपर्यंत वशिला. सारं रान मोकळंच त्याला. मनाला वाटंल तसं तो गावाला फिरवतोय." (लिगाड, पृ.६)

गावगाडयाची सर्व सत्ता तात्यांकडेच केंद्रित झालेली आहे. सरंजामशाहीवृत्ती, जुलूम, जबरदस्ती, अन्याय, अत्याचार, स्वार्थ, राजकारणपटू स्त्रीलंपट असे त्यांचे वागणे दिसून येते. तात्यांच्या अशा वागण्याला उघड प्रतिकार करण्याची हिंमत होत नाही. दाजीतात्यांच्या वागण्याविषयी लोक पाठिमागे बोलताना म्हणतात,

"या दाजीतात्याला पायतानानं हाणायला पाहिजे. याने एक बाई धड सोडली नाही." ("लिगाड", पृ.२५)

तात्यांच्या वागण्याविषयी गावात अशा प्रतिक्रीया उमटतात. परंतु तात्यांच्या तोंडावर बोलण्याचे धाडस कोणाचेही होत नाही. कारण त्यांना विरोध करणा-या माणसांना त्यांनी माणसातून उठविलेले असते.म्हणून तात्यांचा हा अन्याय सर्वजण निमूटपणे सहन करत असतात.

तात्या बजरंगाची बहिण शकू हिला फसवून मळ्यात बोलवितात. मळ्यात आल्यावर तिच्यावर बलात्कार करतात. हे प्रकरण दडपण्यासाठी मीच तिला पळून जात असताना पकडून आणल्याचे सांगतात. तात्या आपल्या वासनेची भूक भागवितात परंतु शकूचे जीवन उद्ध्वस्त होते. तात्या ऊस तोडीला आलेल्या लगम्याच्या बायकोबरोबर संबंध ठेवतात. आठ दिवस तिला छपरातून बाहेर सोडीत नाहीत. तात्याच्या या कृत्यामुळे लगमन्नाचा संसार उद्ध्वस्त

होतो. वासनेने पछाडलेले स्त्रीलंपट तात्या स्त्रियांना आपल्या जाळ्यात पकडून वासनेची भूक भागवितो. अशा अनेक भानगडींनी तात्यांचे व्यक्तिमत्व डागाळलेले आहे.

साखरकारखान्यात तात्यांचे वजन आहे. चेअरमनकडे वशिला लावून आपला मुलगा मानसिंगराव यांचा "आदर्श शेतकरी" म्हणून सत्कार समारंभ घडवून आणतात. आपली प्रतिष्ठा व मोठेपणा मिरविण्याचा हेतू यामध्ये असतो. कारखान्यात पैसे चारून तात्या ऊसाचे वजन वाढवून घेतात. तात्यांच्या कारस्थानाविषयी लोकांच्या प्रतिक्रिया अशा व्यक्त होतात,

"काय दुखतंय आवरेज पडायला. सोसायटीचं खत घरात आणि इरिगेशनचे पाणी हैच्या बायलींच्या हिरितच पडतया मग ! (लिगाड, पृ.३३)

तात्या पाणी सोसायटीचे चेअरमन आहेत. सार्वजनिक पाण्याचा पाट स्वत:च्या विहिरीत सोडतात. इतराना पाणी मिळत नाही. पिके जळतात. परंतु तात्यांचा मळा हिरवागार असतो. तात्याशिवाय सोसायटीचे पान हालत नाही.

राउ पाटील, जालिंदर कांबळे या माणसांना हाताशी धरुन तात्या गावचे राजकारण खेळतात. जालिंदर कांबळेला ग्रामपंचायतीत डेपुटीपद देतात. त्याचा फायदा सारा दलित समाज तात्यांच्या पाठिशी असतो. जैन आणि मराठा यांच्यात संघर्ष निर्माण करून आपली राजकीय खेळी खेळतात. जातीजातीत भांडण, भावाभावात तेढ निर्माण करून सर्वांचे स्वास्थ्य बिघडवून आपला स्वार्थ साधतात.

खेड्यातील स्वार्थी, लपंट, राजकारणी, बेमूर्तपणा असा तात्यांचा स्वभाव आहे. सरंजामशाही वृत्ती, प्रतिष्ठा सत्ता टिकविण्यासाठी तात्या सतत काहीतरी भानगडी करतात.

"लिगाड" या लघुकादंबरीत नायक आणि खलनायक दाजीतात्या आहेत. तात्यांचे असे दुभंगलेले व्यक्तिमत्व कादंबरीत दिसते. "लिगाड" कादंबरीचे कथानक दाजीतात्यांच्या स्वभावाचे विविध पैलू उलघडत जाते. गावाची सत्ता तात्यांकडे आहे. तात्यांनी गावात अनेक विकासाच्या योजना आणल्या आहेत. तात्यांनी गावात सहकाराचे जाळे विणले आहे. पिकांच्या उत्पादन वाढीला त्यांनी चालना दिली. त्यामुळे तात्यांना मान व प्रतिष्ठा मिळू लागली. कादंबरीच्या नायकाच्या ठिकाणी असणारे गुण तात्यांजवळ आहेत म्हणून तात्या "लिगाड" कादंबरीचे नायक आहेत.

सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा यांचे केंद्रिकरण तात्यांजवळ झाल्यामुळे तात्यांचे वागणे बदलत जाते. सत्ता टिकविण्यासाठी तात्यांचा परिस्थिती विरुध्द संघर्ष सुरू झाला. त्यांच्या वागण्यातील वेगळेपण, धूर्तपणा, बेरकीपणा यामुळे तात्या आपल्या जीवनातील अनेक घटना दडपून टाकू लागले. यातूनच त्यांचे मानसिक स्वास्थ्य बिघडत जाऊ लागले. यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वाला दुभंगलेपण आले. तात्यांला जीवनात धड खरेपणानेही जगता येत नाही. आणि खोटेपणावर पांघरुन घालण्याचा प्रयत्न करतात. दुसरीकडे वासना-विकारांनी पछाडलेले मन आहे. त्यामुळे तो सतत अस्वस्थ आहेत.

तात्या जीवनात खलप्रवृत्तीने वागतात. त्यामुळे त्यांच्या जीवनाला अस्थिरता प्राप्त झाली आहे. सतत काहीतरी भानगडी करण्यात ते गुंतलेले आहेत.

दाजीतात्यांची ही व्यक्तिरेखा बदलत्या ग्रामीण जीवनाची प्रेरणा घेऊन "लिगाड" कादंबरीत आली आहे. लोकशाहीत ग्रामीण भागातील नव्या शोषणकर्त्याचे दर्शन लेखक घडवतात.

2 <u>धोंडीनाना :</u>

धोंडीनाना हे "खांदेपालट" या लघुकादंबरीतील प्रमुख पात्र आहे. धोंडी-

नाना बागायतदार आहेत. त्यांना आपल्या बागायती शेतीबद्दल मोठेपणा वाटतो. नानांचा हा मोठेपणा व्यक्त करताना लेखक म्हणतात,

"...... हे माझं. एकटयाचं...... मी एकटाच हया बागाईतीला.. हयाच्यात मधी कुणाचं तंगडं नाही. अकरा एकराचा एकमोरी डाग... रट्टया-च्या जोरावर एकल्यानंच हे उभं केलं.... हयात पुन्हा भर घालत राहयचं.... वा बास रे गबरू... (खांदेपालट, पृ.४७)

यातून नाना स्वत:ची प्रतिष्ठा । मोठेपणा प्रकट करतात. बागायती-च्या जोरावर नाना श्रीमंत झाले आहेत. नाना बागायतीवर जसे प्रेम करतात तसे नाना आपल्या गो-यापान शरीरावरही प्रेम करतात. नानाला स्वतं:च्या शरीराचा अभिमान आहे. नानाच्या शरीराचे बाहय वर्णन करताना लेखक म्हणतात.

"वयाची पन्नासी उलटली तरी नानांच्या गो-यापानं कातडीवरची तकाकी अजून तशशी होती. तरण्याबांड पोरासारखे भक्कमं खांदे, पिळदार मिशा, चपचपीत तेल घातलेल नवं कोरं पायतान, लांबसडकं बोटातील नाजूक अंगठी, अंगात रग अजून ताजीतवणी." (खांदेपालट, पृ.४६)

मध्यम वयाचे नाना मनाने अजून तरूण आहेत. धोंडीनाना हे समांतर सत्तास्थानाचे केंद्र आहेत. गावच्या राजकारणात आपली पकड चांगली बसविली आहे. गावातील रामभाऊ गावडे, यलाप्पा कांबळे याना हाताशी धरून आपले राजकारणातले आसन पक्के करतात.

नाना बेरकी आहेत. राजकीय खेळी ते धूर्तपणे खेळतात. सरपंचपद आपणाकडे रहावे म्हणून खांदेपालट मोडीत काढतात. ग्रामपंचायतीची खांदे-पालट न करता दुसराच डाव टाकून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करतात. यलाप्पा कांबळेला ग्रामपंचायतीतील टी.व्ही. हरिजनवाडयात बसविण्यास सांगतात. आणि यलाप्पाची शिट आपल्या बाजूने पक्की करतात. महार आणि चांभार

यांच्यात एकजूट होऊ द्यायची नाही म्हणून नाना प्रयत्न करतात. महार, चांभार या दोन जातीत तालमीचा प्रश्न उपस्थित करतात व कायमचा झगडा लावतात. यातून आपला राजकीय फायदा उठवितात.

नाना सरपंच असताना गावाच्या विकासाचे काहीच काम करीत नाहीत. उलट सरकारी पैसा खातात. नानांच्या या वागण्याविषयी ग्रामपंचायतीचे सदस्य तुकाराम पाटील म्हणतात.

"..... उकीरडा केला सा-या गावाचा हैनी. पर्तेक घरात भांडणं. भावकीत तीडं. जातीजातीत फाटाफूट. महार-चांभार असा कायम तिडा ठेवला हैनी भावाभावात एकाचं दोन करून काठया-कु-हाडी घेऊन एकमेकाच्या अंगावर जाईपर्यंत हैची शिकवाशिकवी.... सा-या गावाची हागंदारी केली हेनं." (खांदेपालट, पृ. ६२-६३)

सरपंच पदावर असताना नानांनी विकासाची काही कामे करावयाची ठरलेले असते. परंतु नाना सरकारी पैसा खातात. नानांच्यावागण्याविषयी गावात लोकांच्या प्रतिक्रिया उमटतात. परंतु त्यांच्या तोंडावर बोलण्याचे किंवा त्यांच्या वागण्याला विरोध करण्याचे धाडस कोणी करत नाही. मनगटाच्या जोरावर नाना सर्वकाही रेटून नेतात. सारे समाजजीवन अस्थिर करून सोडतात.

रामा चांभाराची मुलगी राजीवर नाना बलात्कार करतात. तिला मारून विहिरीत टाकतात. एखाद्या चित्रपटातील देखाव्याप्रमाणे नाना हे कारस्थान घडवून आणतात. नंतर आपल्यावर आलेली बाजू सहजपणे झटकतात. आपल्या वासनेची भूक भागवून राजीचे जीवन फुलाप्रमाणे कुस्करून टाकतात. राजीचे हे प्रकरण नानाच पुढाकार घेऊन मिटवतात.

नानांचा यामध्ये राजकीय डाव असतो. लकुळ्या चांभार ही देवाची

म्हणजे तुकाराम पाटलांची शिट असते. म्हणून ते लकुळयाला असे जाळयात पकडतात. राजीला मूठमाती देण्याची घाई करतात. तिच्या नव-याला निरोप देण्यासाठी आपली बुलेट देतात. या प्रकरणात आपला काही संबंध नाही असे भासविण्याचा नाना प्रयत्न करतात.

सत्ता, संपत्ती आणि शक्ती नानांकडे आहे. परंतु नानांचे मन स्थिर नाही. नाना गुडीपाडव्याला नवी ट्रक आणतात. हे नानांचे ऐश्वर्य असते. त्याच दिवशी त्यांचा एकुलता एक मुलगा बाळासाब दारू पिऊन धुमाकूळ घालतो. गावातील मुलींची छेड काढतो. लोकांचा मार खातो. मुलाचे हे वागणे नानांचे काळीज पोखरत असते. नानांच्या गो-या पायावर इसबाचा काळा डाग आहे, तसे नानांच्या ऐश्वर्यसंपन्न जीवनाला किड लागलेली आहे.

"खांदेपालट" या लघुकादंबरीचा नायक आणि खलनायक नानाच आहेत. शक्तीच्या सामर्थ्यावर जीवनातील अनेक प्रसंग ते रेटून नेतात. "खांदेपालट" कादंबरीचे कथानक नानांच्या स्वभावाची विविध वैशिष्ठये उलगडत जाते. त्यामुळे नानांची व्यक्तिरेखा उठावदार व महत्त्वाची आहे.

नानांचा बेरकीपणा, जगण्याच्या वेगळया पध्दती त्यामुळे त्यांच्या जीवनाला दुभंगलेपण प्राप्त झाले आहे. जगण्यातील मग्रूरी त्यांच्याजवळ आहे. तरी त्यांना खरेपणाने जगता येत नाही. शेवटी ते हताश होतात. रामभाऊंचा लुकडा खांदा त्यांना डोंगराएवढा आधार वाटतो. जीवनातील सारे प्रसंग रेटून नेण्याची उमेद असणारा नाना मनाने खचतो. आणि त्यांना भविष्यकाळाची स्वप्ने दिसू लागतात.

आता आपले दिवस फिरणार आहेत याची चाहूल नानाला लागते. मुलगा व्यसनाधीन होतो. नानांची सत्तेवरची पकड ढिली होते. संपत्तीला ओहटी लागते. त्यामुळे त्यांचे जीवन अस्थिर होते. त्यांच्या वागण्यामुळेच त्यांच्या वागण्याला दुभंगलेपण प्राप्त होते.

बदलत्या ग्रामीण जीवनात सत्ता,संपत्ती, प्रतिष्ठा, वासनातृप्तीच्या पाटीमागे लागलेल्या नानांच्या जीवनाला असे दुभंगलेपण आले आहे. धोंडीनाना ही व्यक्तिरेखा दुभंगलेल्या अवस्थेत दिसते.

१.२ <u>महत्वाच्या व्यक्तिरेखा :</u>

"लिगाड" आणि "खांदेपालट" या लघुकादंबऱ्यात काही व्यक्तिरेखा महत्वाच्या आहेत. कादंबरीच्या आशयात या व्यक्तिरेखांनाउठावदारपणा प्राप्त झाला आहे. यामधील काही व्यक्तिरेखा केंद्रिभूत म्हणून आलेल्या आहेत. तर कथानकातील घटनांमुळे काही व्यक्तिना महत्व प्राप्त झाले आहे. या दोन्ही कादंबऱ्यात रघू, शिवा, बजरंग, जाजिंदर कांबळे, तुकाराम पाटील, यलाप्पा कांबळे, बाळासाब या व्यक्तिरेखांना उठावदारपणा प्राप्त झालेला आहे. या व्यक्तिरेखांचा परिचय येथे करून घ्यावयाचा आहे.

१) <u>रघू :</u>

रघू हा "लिगाड" कादंबरीचा निवेदक आहे. रघू हा गरीब शेतकरी कुटुंबातील मुलगा आहे. शेती करण्यासाठी नोकरी सोडून तो गावी आलेला असतो. रघूच्या मनातील विचार प्रकट करताना लेखक म्हणतात. "....पांढरपेशा जीवनाचा तिटकारा म्हणून नोकरी सोडून गावाकडं आलो. "खेडयाकडं चला" हे फार दिवसाच स्वप्न. शेती करता करता लोकांना शिक्षण देऊनलोक शहाणे करून सोडू, वाचनालय काढू. सगळ्या रूढी चाली गाडून टाकू. तिथं त्यांच्यात राहूनच हे कराय पाहिजे अशी स्वप्नं घेऊन आलो होतो." ("लिगाड", पृ. २१)

रघूचे विचार विकसित आहेत. कष्ट करून ऊसाचे पिक काढायची जीद्द आहे. भरपूर कष्ट करून जमीन पिकवायची उमेद रघूजवळ आहे. नोकरीत

असताना त्याला वाटायचे आपल्या गावाला नदी आहे. पाणी खेचणाऱ्या वीसवीस हॉर्सपावरच्या मोटर्स आहेत. हे जॅकवेल म्हणजे बागायतदारांचे नदीवर बसविलेले नशीब आहे. आपली शेती आहे. गबर होऊन जाऊ हे असे रघूचे स्वप्नं आहे.

गावातील प्रत्यक्ष परिस्थिती पाहिल्यावर त्याच्या उमेदीवर विरजन पडते. पाणीपट्टी भरली असतानाही आपल्या ऊसाला पाणी का मिळत नाही, म्हणून तो पाणी सोसायटीत भांडण करतो. आरेला कारे म्हणून आपणाला जीवन जगता येत नाही याची त्याला जाणीव होते. तरुण रक्ताच्या रघूलाही ऊसाची तहान कळते. तो पिकाबरोबर बोलतो. पिकाच्या वेदना त्याला समजतात. ऊसाचे पिक पाहिल्यावर रघू म्हणतो -

".... जित्राबाचा जीव माणसागत. खायप्यायला असलं, की माणूस खुशाल असतं. पिकाला खतपाणी झालं, की पिकंसुध्दा वाऱ्यावर खिदळू लागल्यात. उनावर चमकत्यात. भर उनात ऊस बघितला तर गारेगार दिसतोय. कुठं एक पानसुध्दा कानपल नव्हतं." ("लिगाड", पृ.२)

यावरुन रघू पिकाशी एकजीव झालेला आहे. कष्ट करण्याची उमेद त्याच्याजवळ आहे. तो पिकावर प्रेम करतो. पिकाला वेळेवर पाणी मिळावे असे त्याला वाटते. परंतु गावच्या वातावरणात पाटाच्या पाण्याला आता केंद्रवर्ती स्थान प्राप्त झाले आहे. त्यामुळे तात्याच्या राजकारणाविषयी धुसफुसत रहाण्यापलीकडे कोणी काही करु शकत नाही. त्यामुळे रघुसारख्या तरुणांचा प्रसंगी होणारा उद्रेकही केविलवाणा वाटतो.

तात्याच्या सरंजामशाही वागण्याचा तीडा त्याला समजतो. त्याला वाटते दाजीतात्यांचा हा अन्याय निपटून काढला पाहिजे. तो गावातील तरुणांना एकत्र करण्यांचा प्रयत्न करतो. परंतु रघूच्या सुशिक्षित डोक्यातील विचार गावात रुजत नाहीत. तात्याविषयीचा संताप जळजळीत असूनही त्याला

गप्प बसावे लागते. गावात प्रतिकार शक्ती उभी रहात नाही. त्यामुळे त्याच्या मनाची सतत घुसमट होत रहाते.

सरळमार्गी आपणाला जीवन जगता येत नाही, याची जाणीव होते. तो बापूना म्हणतो, "हा तात्या गावाच्या ऊरावर बसलाय तरी कोणी काही बोलत नाही. हे वागणे बंद केले पाहिजे." रघूचा हा विचार बापूना मान्य होत नाही. परंतु तो रघूला खडसावतात व त्याचे तोंड बंद करतात.

अन्यायाविरूध्द रघूला पोटची तिडीक आहे. त्याच्या मनाची सतत घुसमट होत रहाते. एका तरूणीचे जीवन तात्याने कसे उद्ध्वस्त केले या विचाराने त्याचे डोके सुन्न होते. शकीला तो धीर देतो. मनाने खचलेला त्याचा मित्र बजरंगाला तो सावरण्याचा प्रयत्न करतो.

आपल्या विचारापेक्षा वेगळे राजकारण गावात चालते याची जाणीव त्याला होते. हा अन्याय निपटून काढण्याचे तो ठरवतो. रघूजवळ चांगले विचार आहेत. रघू परिस्थितीचे भान सांभाळतो. तापट स्वभावाच्या आपल्या भावाला तो सतत आवरण्याचा प्रयत्न करतो.

रघूला वाटते गावाला नदी आहे. इरिगेशन आहे. शेतीला भरपूर पाणी आहे. सर्वांनी कष्ट करून शेती भरपूर पिकवावी. स्वत:चा विकास घडवावा. गावाचा विकास घडवावा. गोरगरीबाना न्याय मिळावा, गावातील अन्याय जुलूम थांबवावेत. ख-या लोकशाहीचा हक्क सर्वांना मिळावा, परंतु रघूचे हे विचार समाजात रूजत नाहीत. त्याची निराशा होते.

"लिगाड"मधील रघूची व्यक्तिरेखा ग्रामीण भागातील विकसित तरूणांचे प्रतिनिधित्व करते. रघूसारखा धडपडणा-या तरूणाची कशी कुचंबना होते, हे या व्यक्तिरेखेतून दिसते. गावातील सत्तास्थान आणि बलस्थान यापुढे रघू हतबल होतो.

२) <u>शिवा :</u>

शिवा हे "लिगाड" कादंबरीतील व्यक्तिरेखा आहे. शिक्षण सोडून वडिलार्जित शेती तो करत असतो. शिवा कष्टाळू आहे. शिवाच्या कष्टाळूपणाबद्दल सांगताना लेखक म्हणतात,

"त्याला कामाचा उरक दांडगा. मांडीला अधी चड्डी. अंगात नुंडी-छाट, उसाचं पान म्हणून त्याच्या अंगाला लागत नव्हतं. अंगाला घट्टंच पडलेल." ("लिगाड", पृ.२)

शिवा जसा कष्टाळू आहे तसा तो तापट स्वभावाचा आहे. त्याच्यावर झालेला अन्याय त्याला सहन होत नाही. शिवाच्या मोकळया रानातून बाजीचा ट्रॅक्टर जाताना तो रागवतो. तात्याचे आरेरावीचे वागणे त्याला सहन होत नाही. शिवाचा संताप व्यक्त करताना लेखक सांगतात.

"त्यानं मला मागं ढकललं आणि ट्रॅक्टरच्या पुढच्या टायरीवर हातातल खुरपं मारुन जोरात म्हणाला, "ये बागायतदाराच्या बच्च्या ! लई शानपन गाजवू नगंस. मुकाटयानं ट्रॅक्टर रानाच्या भाईर काढ न्हाईतर पुढच्या इंजनावर दगडूच घालतो बघ." (लिगाड, पृ.४)

शिवाचा स्वभाव सरळ आहे. त्याच्यावर कोणी अन्याय केलातर त्याला सहन होत नाही. लगम्याला तो पाण्यासाठी पैसे देतो. परंतु ज्यावेळी त्याला पाणी मिळत नाही त्यावेळी तो लगम्याच्या अंगावर तूटून पडतो. हे सांगताना लेखक म्हणतात,

"काय सांगू नगो भुक्क. तुमच्या आयला वाल्यो. शिवा असा तोडून जनावरागत ओरडला. त्यानं इकडंतिकडं पाहत दणादणा नाचून छपराजवळ पडलेली मोठी दगडाची फाड उचलली. आणि डोकीच्या वर उचलून पळत पळत येऊन सरळ विहिरीकाठावर बसवलेल्या मोटारीवर धाडदिशी टाकली. तुमच्या आयला.. तुमची मस्तीच काढतो बाईर. आता जीव गेला तर गेला."(लिगाड,पृ.४३)

दाजीतात्यांच्या वागण्याविषयी शिवा पोटतिडीने बोलतो. तात्यांच्या विहिरीत पाटाचे पाणी जावू द्यायचे नाही असे ठरवितो. पण आडवल्याचा बदला म्हणून तो बाजीला मारतो. सतत त्याच्या मनात तात्याविषयी संताप जळजळत असतो. तात्यांची सारी कारस्थाने त्याला माहित असतात. त्यामुळे तात्यांच्या साऱ्या भानगडी तो गावाला सांगतो. आपला संताप लोखंडी मोटर्सवर मारून शांत करतो.

शिवा धाडशी आहे. तात्यांविरुध्द तो बंड करून उठतो. गावातील इतर तरूण त्याला साथ देत नाहीत. परंतु तो एकटा तात्याला विरोध करत असतो.

"लिंगाड" कादंबरीतील शिवाचे पात्र ग्रामीण भागातील धडपडणाऱ्या कष्टाळू धाडशी आणि तापट स्वभावाच्या तरूणाचे प्रतिक आहे. गावातील बलस्थानामुळे उत्साही सरळ स्वभावी, जिद्दी तरूणाच्या मनाची कशी घुसमट होते. गावातील सत्ताधिशाच्या अन्यायामुळे शिवासारख्या तरूणांची सतत कुचंबना होते.

३) बजरंग :

वाघाप्रमाणे जीवन जगणाऱ्या बजरंगाची व्यक्तिरेखा आहे. बजरंग हा एका विधवा बाईचा मुलगा आहे. त्याला कुस्त्याचा नाद आसतो. त्यामुळे त्याने चांगले शरीर कमावले आहे. गावात तात्यासह सर्वजन त्याला वचकून असतात. कष्ट करून प्रामाणिकपणे जगणारे बजरंगाचे कुटुंब आहे.

बजरंग आपला स्वाभिमान जपण्याचा सतत प्रयत्न करत असतो. दाजीतात्या त्याची बहिण शकूवर बलात्कार करतात. बहिणीच्या आळूमुळे तो मनाने खचतो. बजरंगाच्या जगण्यातला उत्साह संपतो. त्याच्या शरीराची कळा पालटते. बजरंगाची आवस्था सांगताना लेखक म्हणतात.

"वाघासारखा बजरंग बहिणीच्या काळजीनं पार खंगून कोळसा झाला. उतरलेल्या खाद्यातनं बगळयागत वर निघालेलं मानगूटं, दाढीमिशीतून दिसणारी नाकाच्या दांडीबरोबर उचलेली गालफडावरची हाडं. उघडया अंगान मान खाली घालून पान जुळवत बसलेल्या बजरंगाकडे मी कितीतरी वेळ पहातच होतो.नुसता." (लिगाड, पृ.५)

बहिणीच्या काळजीने तो खंगून जातो. बहिणीला जीवंत मारण्याचा तो निश्चय करतो. तात्याविषयी त्याच्या डोळयात संताप जळत असतो.आपले घर भावकी वाळीत टाकणार ही भिती त्याला असते. त्यामुळे तो नरमतो. अनेक विचारांचे काहूर त्याच्या डोक्यात उटते. त्याच्या डोक्याचा अगदी चिखल होतो.

बजरंगाची आवस्था दात पाडलेल्या वाघासारखी होते. गावात ताट मानेने वागण्याची हिंमत रहात नाही. केस दाढी वाढलेल्या रघूची आवस्था सांगताना लेखक म्हणतात.

"बजरंग ओठ घट्ट मिटवून मुसमुसू लागला. चारी पायांत असकं पडून एखादं दांडगं जनावर जायबंदी होऊन पडावं तशी त्याची अवस्था झालेली. पुढ होऊन मी त्याच्या खांद्यावर हात ठेवला." (लिगाड, पृ.१८)

मनाने खचलेल्या बजरंगाला रघूचा अधार महत्त्वाचा वाटतो. त्याच्या पोखरलेल्या अंत:करणाला फक्त रघू जवळचा वाटतो. वाघासारखे जीवन जगणाऱ्या रघूला दाजीतात्या जायबंदी करतात. दाजीतात्या अशा तरुणाचे शारीराने आणि मनाने खच्चीकरण करतात.

४) <u>जालिंदर कांबळे</u> :

बदलत्या ग्रामीण भागात दलित समाजातील तरुणांची आवस्था चित्रित करणारी ही व्यक्तिरेखा आहे. तो महारवाडयाचा पुढारी आहे. अगोदर त

सेवादलाच्या कलापथकात काम करत होता. नंतर तो दाजीतात्याजवळ आला. तात्यांनी त्याला ग्रामपंचायतीत डेपुटीपद दिलेले असते. तात्यांनी त्याला पुढारी बनवून सारा दलित समाज आपल्या पार्टीशी घातलेला असतो. तात्याच्या बरोबर राहून स्वत:चा विकास करण्यापलिकडे तो काही करू शकला नाही. आपण हरिजन वाडयातील पुढारी आहोत. त्यांच्या विकासासाठी काहीतरी काम करावे असा विचार त्यांने कधी केला नाही.

तात्यांच्या वशिल्याने तो आपल्या भावना कारखान्यात नोकरी लावतो. तात्या सांगतील त्याप्रमाणे तो वागत असतो. पांढरीशुभ्र कपडे घालून तो तात्यांची तोंड भरून स्तुती करत असतो. मानसिंगरावाच्या सत्कार समारंभाच्या वेळी तात्यांच्या कार्याचा अतिशयोक्तीपूर्ण गौरव करून तात्यांवर आपली निष्ठा व्यक्त करतो.

दाजीतात्या जालिंदरचा वापर राजकारणासाठी करतात. जालिंदरला हाताशी धरल्यामुळे सारा दलित समाज तात्यांच्या पार्टीशी असतो. परंतु या समाजाच्या जीवनात विकास घडून येत नाही. जालिंदर उघडपणे तात्यावर निष्ठा व्यक्त करतो, परंतु त्याच्या मनात तात्याविषयी आदर नाही. तात्याही राजकिय पाठिंब्याव्यतिरिक्त त्याला महत्व देत नाहीत. त्यामुळे दलित समाजातही त्याला कोणी महत्व देत नाही.

आपल्या समाजावर होणारा अन्याय तो पाहत असतो. दलित समाजाविषयी त्याला सहानुभूती नसते. जालिंदरची व्यक्तिरेखा दलितांचे राजकारणातील महत्व सूचीत करते. केवळ सत्तेमध्ये ज्याना सहभागी होता आले त्यांनी आपला स्वार्थ साधला. बाकीचा दलित समाज शोषित जीवन जगत असल्याचे चित्र जाणवते.

५) <u>तुकाराम पाटील</u> :

तुकाराम पाटील ही "खांदेपालट" मधील व्यक्तिरेखा आहे. पाटलांचा

स्वभाव शांत असतो. म्हणून गावातील लोक त्यांना देव म्हणतात. त्यांना ग्रामपंचायतीत निवडून देतात. त्यांचे व्यक्तिमत्व विकसित आहे.

गावचा विकास करावा असे देवाना वाटते. देवांच्या बाजूने ग्राम-पंचायतीत बहुमत असते. नियमानुसार देव सरपंच होणार असतात. परंतु नाना राजकीय खेळी खेळतात. पंचायतीत रोटेशनपध्दत ठेवतात. प्रथम आपण सरपंच होतात. देव सरपंच होण्याच्या वेळी नाना खांदेपालट मोहीत काढतात. पंचा-यतीचे सदस्य आपल्या बाजूने घेतात आणि देवांचे राजकारणातून कंबरडे मोडतात.

गावच्या विकासाच्या चांगल्या योजना राबवाव्यात असे देवाना वाटत असते. पिण्याच्या पाण्यासाठी बोर मारावी. गटारी बांधावीत, सार्वजनिक संडास बांधावे, बालवाडी सुरु करावी, गावातील शाळा चांगली चालवावी. असे अनेक विचार देवाच्या मनात असतात. परंतु नानाचे स्वार्थी राजकारण नडते. देवाचे सारे विचार फोल ठरतात.

गोरगरीबाविषयी देवाना सहानुभूती आहे. त्यांचे दारिद्र्य दूर व्हावे असे त्यांना वाटते. त्यांना जेवढी मदत करता येईल तेवढी करतात. त्यामुळे देवाना लोक मानतात. दिवसभर उपासपोटी गवताचा भारा विकणाऱ्या चंदाला दहा रुपयाची नोट देऊन तिचा गवताचा भारा विकत घेतात.

नानांचे राजकारणातील डावपेच त्यांना समजतात. नानांविषयी आपला संताप व्यक्त करताना देव म्हणतात की,

"असल्या भुरट्या पुढाऱ्यास्नी मातीत गाडायचा सरकारने कायदा केला पाहिजे." (खांदेपालट, पृ.६३) देवाचा राजकारणातील उत्साह संपतो. त्यांची कंबर जाते. ते आजारी पडतात. "खांदेपालट"मधील ही व्यक्तिरेखा वैशिष्टय-पूर्ण आहे. सत्तास्थानाविरुध्द बंड करणाऱ्या देवाचे राजकीय कंबरडे मोडते. देवासारख्या सज्जन माणसाचा विरोध दुबळा ठरतो. शेवटी त्यांच्या पदरी निराशा येते.

६) यल्लाप्पा कांबळे :

यलाप्पा कांबळे ही "खांदेपालट" मधील व्यक्तिरेखा आहे. तो दलितांचा पुढारी आहे. धोंडीनानांनी त्याला ग्रामपंचायतीत डेपुटीपद दिलेले असते. यलाप्पा नाना सांगतील त्याप्रमाणे वागतो. नाना शिकवतील त्याप्रमाणे मिटींगला बोलत असतो. त्याला स्वत:चे व्यक्तिमत्व नाही. यलाप्पाचा वापर केवळ राजकारणासाठी केला आहे. यलाप्पाला हाताशी धरुन नानांनी दलित समाज आपल्या बाजूने घेतलेला असतो.

हरिजन वाड्यात बालवाडी काढण्यासाठी दिलेले पैसे तो खातो. आपल्या समाजाच्या अडचणी दूर करण्याऐवजी स्वत:चे घर बांधतो. नानाच्या मदतीने आपल्या भावाना नोकरीला लावतो. नाना त्याला टी.व्ही. देण्याचे आमिष दाखवतात. यलाप्पाच्या वागण्याविषयी देवाच्या प्रतिक्रिया व्यक्त करताना लेखक म्हणतात,

"हे यल्ल्या किती खुळं आसंल ! नानानं त्येच्या म्होरं टीव्हीच गाजार धरलं म्हंटल्यावर ते नागवं हून नाचायाच लागलंय. आता ह्यो यल्ल्या हरिजन पुढारी, तक्क्यात टी.व्ही. लावून म्हारवाडयात काय उजेड पाडणार हाय कुणाला दकल ! आवो पोरास्नी कुठं नोक-या कामधंदा हुडकून तिकडं सूत-गिरणीत कामाला चिकटून घाचं हे हेला सुचत न्हायी ? पुना सुक्काळीचं सारखं नानाचा काशुटा धरून, तुमाला तरी हे पटतंय का ? हे नुस्तं डिपुटी सरपंच म्हणून मिरवायच्या लायकीचं हाय!" (खांदेपालट, पृ.६१)

दलित समाजाचा पुढारी असणारा यलाप्पा आपल्या समाजापासून मात्र दुरावला आहे. आपण पिढ्यानपिढ्या अन्याय सहन करत आहोत याची जाणीव त्याला असते. परंतु नानाला उघडपणे विरोध करण्याचे धाडस त्याच्या जवळ नसते. नानांवर आपली वरवर निष्ठा व्यक्त करतो. परंतु नानाच्या वागण्या-विषयी त्याच्या मनात संताप असतो.

गावातील साऱ्या बातम्या नानांना पुरविण्याचे काम तो करतो. नांनाबरोबर तो सतत फिरत असतो. त्यामुळे आपणही मोठा पुढारी आहोत हा अभिमान त्याला वाटतो. दलित आणि मराठा समाजातही त्याला किंमत नसते. हातातील बाहुल्याप्रमाणे नाना नाचवतील तसे तो नाचत असतो.

लोकशाहीत दलितांना राजकारणात सहभागी होता आले. परंतु ग्रामीण भागात दलितांचा वापर फक्त राजकीय पाठिंब्यासाठी करून घेतलेला दिसतो. राजकारणात यलाप्पासारख्यांना संधी मिळाली. त्यांनी स्वत:चा फायदा करून घेतला. तो आपल्या समाजापासून दुरावत गेलेला दिसतो. हे या व्यक्तिरेखेतून जाणवते.

"खांदेपालट" मधील ही व्यक्तिरेखा दलितांचे जीवन सूचित करते. गावातील सत्ताप्रमुख त्यांचा वापर केवळ राजकारणासाठी करून घेतात. सत्ताप्रमुखांबरोबर राहून यलाप्पासारखे आपला फायदा करून घेतात व बाकीचा दलित समाज उपेक्षित राहतो.

७) बाळासाब :

"खांदेपालट" मधील ही व्यक्तिरेखा आहे. बाळासाब हा नानांचा मुलगा आहे. बाळासाबचे बाह्य वर्णन करताना लेखक म्हणतात, "उंच शिडशिडीत शरीर असलेल्या बाळासाबला खांदे खाली पाडून उभे रहाण्याची सवय असते. त्याच्या शांत स्वभावामुळे गावातील लोक त्याला देवगुणाचा समजायचे." (खांदेपालट, पृ.७७)

गावातील उनाड राजीवर त्याचे प्रेम असते. राजीच्या अचानक मृत्यूमुळे तो अस्वस्थ होतो. नानांनी तिला मारले याचा संशय त्याला येतो. त्यामुळे त्याच्या डोक्यावर परिणाम होतो. त्याचे वागणे बदलते. दारूचे व्यसन लागते. गावातील मुलींची तो छेड काढतो. लोकांचा मार खातो. शहरात

जाऊन प्रेमनगरला भेट देऊन येतो. मळयात कामाला येणाऱ्या बायकाबरोबर अश्लिल चाळे करु लागतो. वासनेच्या आणि व्यसनाच्या अधिन जीवन जगू लागतो.

दारु पिऊन तो धुमाकूळ घालतो. व्यसन वाढत जाते आणि दिवसभर दारुच्या धुंदीत पडून रहातो. बापाच्या संपत्तीवर चैनीत जीवन जगतो. बाळासाबचे जीवन वाया जाते. एक दिवस त्याच्या लग्नाचा विषय नाना काढतात. त्यावेळी नानांवर असणारारा संताप तो व्यक्त करतो. "बायको कोण सांभाळणार असे नाना विचारताच तो आपल्या मनातील उत्तर देतो, "तुम्ही असतापैकी गाव कशाला पाहिजे". (खांदेपालट, पृ. ८९)

नानांच्या ऐश्वर्यसंपन्न जीवनाला बाळासाब कीड लावतो. आपल्या एकुलत्या एक मुलावर नाना संस्कार करायला असमर्थ ठरतात. त्यामुळे तो वाया जातो. "खांदेपालट" मधील ही व्यक्तिरेखा ग्रामीण जीवनातील चित्रणातील बदलते जीवन चित्रित करते. गावातील सत्ताप्रमुखांची मुले संपत्तीच्या जोरावर कशी वाया जातात हे बाळासाबच्या व्यक्तिरेखेतून जाणवते.

१.३ <u>स्त्री व्यक्तिरेखा :</u>

"लिगाड" आणि "खांदेपालट" या दोन लघुकादंबऱ्यात आलेल्या स्त्रियांच्या व्यक्तिरेखा वैशिष्टयपूर्ण आहेत. गावगाडयात जो सत्ताधिश आहे, त्यांच्या वासनेला बळी पडलेल्या काही व्यक्तिरेखा आहेत. बदलत्या ग्रामीण जीवनात राजकारणाचे स्वरुप बदलत गेले. या बदलत्या ग्रामीण राजकारणात स्त्री हा घटक महत्वाचा मानला जाऊ लागला. त्यामुळे काही स्त्रियांच्या जीवनाशी राजकारण खेळले जाऊ लागल्याचे चित्र दिसू लागले.

या कादंबऱ्यात काही व्यक्तिरेखा विधवा आहेत. काही नवऱ्याने सोडून दिलेल्या परित्यक्ता आहेत. काही स्त्रिया उनाड आहेत. छीनाल

आहेत. तर काही स्त्रिया दरिद्रयात गुलामगिरीत दारिद्रयात शोषित जीवन जगत आहेत. यातील बऱ्याच स्त्रिया सत्ताप्रमुखाच्या वासनेच्या शिकार झाल्या आहेत. याना स्वतःचे अस्तित्व नाही असे दिसते. आपल्या वाट्याला असलेले जीवन या निमूटपणे जगतात. जीवनातील दुःख, दारिद्रय अन्याय सहन करतात. परंतु अत्याचाराविरुध्द बंड करण्याचे धाडस त्यांच्याजवळ नाही. त्यांची प्रतिकारशक्ती दुबळी असते. त्यामुळे अनेक स्त्रियांचे जीवन उद्ध्वस्त होते. या स्त्रिया मातीमोल जीवन जगतात. यांच्या जीवनाचा शेवट झाला तरीसुध्दा समाजाला त्याविषयी काही वाटत नाही. या स्त्रियांच्या जीवनाचे स्वरुप आपणाला समजावून घ्यायचे आहे.

१) <u>शाकी</u> :

"लिगाड" कादंबरीतील शाकीची व्यक्तिरेखा महत्त्वाची आहे. शाकी बजरंगाची बहिण आहे. तिचे लग्न झाल्यावर सासरी जाते. परंतु सासरचे सुख तिच्या नशिबी नसते. लग्न झाल्यापासून एक वर्षाच्या आत तिचा नवरा दारु पिऊन मरतो. ऐन तारुण्यात विधवापण घेऊन ती माहेरी येते. शाकीचे जीवन उद्ध्वस्त होते. तिचा जीवनपट उभा करताना लेखक म्हणतात,

"जाधवाच्या शाकूचं लगीन झालं. एका वर्षातच दारु ढोसून ढोसून तिचा नवरा वारला. पांढरं कपाळ घेऊन ती जन्मलेल्या घरात परत आली. जीव मारुन भावाच्या घरात आईजवळ राहिली. भांडीकुंडी करत भावांची कापडं लक्तरं धूतखरं, कोरड्या जमिनीनं टाळा पसरला आणि घडू नये ते घडलं. गावभर बभ्रा झाला. शाकीचा जन्मच नासला." (लिगाड, पृ. १४-१५)

शाकी तरुण आहे. ती आपल्या नैसर्गिक भावना आवरु शकत नाही. अतृप्त भावनेला ती वाट मोकळी करुन देते. बबनवर तिचे प्रेम असते. त्याच्या बरोबर पळून जाऊन लग्न करण्याचे तिने ठरविलेले असते. नव्याने संसार उभा

करायचा अशी तिची इच्छा असते. परंतु तिच्या सा-या स्वप्नांचा चुराडा होतो.

शकीचे आणि बबनचे संबंध दाजीतात्याना समजतात. तात्या तिला फसवून मळयात बोलावतात. मळयात आल्यावर तिच्यावर बलात्कार करतात. आपल्या वासनेची भूक भागविल्यावर दुस-या दिवशी तिला गावात आणतात. पळून जाताना मिच तिला पकडून आणले असे खोटे सांगतात.

दाजी तात्याने बलात्कार केल्यावर तिच्या जीवनाला वेगळे वळण लागते. ती आईपासून व भावापासून दुरावते. तिचे पोटचे पाडून आणतात. बजरंग तिला जिवंत मारण्याचे ठरवितो. दररोज भावांचा मार खावून शकी अशक्त होते. तारुण्याने मुसमुसलेल्या शकीची आवस्था पालीसारखी होते. शकीच्या वागण्याविषयी गावातील लोक उलटसुलट चर्चा करतात. दाजीतात्या तिला माणसातून उठवतो.

"लिगाड" मधील ही व्यक्तिरेखा ग्रामीण समाजातील विधवांचा जीवनपट उभा करते. या स्त्रिया गावातील सत्ताप्रमुखाच्या वासनेच्या शिकार होतात. त्यांची प्रतिकार शक्ती दुबळी असते. विरोध करण्याचे धाडस याना होत नाही. जगण्यासाठी त्यांना स्वतंत्र अस्तित्व नाही. अन्याय, अत्याचार शोषित जीवन जगण्याचे यांच्या नशिबी येते. आयुष्यभर आपल्या भावना जाळीत त्या जगत असतात. शेवटी त्यांचे सारे जीवनच उद्ध्वस्त झालेले दिसून येते.

या व्यक्तिरेखा अशिक्षित आहेत. रूढ नैतिक जगणा-या आहेत. त्यामुळे फसवणूकीला बळी पडतात. त्यातच त्यांच्या जीवनाचा शेवट होतो. त्यांच्या वागण्यामुळे कुटुंबाची वाताहत होते. सर्व कुटुंबाला सहन करावा लागतो. बदलत्या ग्रामीण जीवनात या स्त्रिया राजकारणाचा बळी ठरतात. शकीवर

होणारा बलात्कार राजकीय सूडामुळे झालेला असतो. शकीचा भाऊ बजरंग दाजीतात्यांच्या वागण्याला विरोध करीत असतो. त्याला नम-विण्यासाठी दाजीतात्या शकीवर बलात्कार करतात. गावातील राजका-रणाचा धागा यांच्या जीवनाशी गुंतला जातो. त्यामुळे असे वेगळे जीवन यांच्या वाटयाला येते.

२) <u>राजाक्का :</u>

राजाक्का ही "खांदेपालट" मधील स्त्री व्यक्तिरेखा आहे. राजीला नव-याने सोडून दिलेले असते. लग्न झाल्यावर मानपान आणले नाही म्हणून तिचा नवरा दुसरे लग्न करतो. त्यामुळे राजी माहेरी बापाजवळ राहत असते.

राजी रामा चांभाराची मुलगी आहे. नव-याने सोडल्यापासून बापा-च्या घरी मोलमजूरी करुन जीवन जगते. ती तरुण आहे. त्यामुळे तिच्या तारुण्यावर गावातील उनाड मुलांचा डोळा असतो. नानांच्या मळयात ती मजूरीला जात असते. नानांचा मुलगा बाळासाबवर तिचा जीव बसतो. बाळा-साब बरोबर आपले संबंध जोडण्यासाठी नानांच्या मळयातील चाकरीचा गडी मारुती बरोबर लगट करते. मारुतीबरोबर केळीच्या बागेत प्रणय करीत असताना ती नानाला सापडते.

नाना मारुतीला मारुन पिटावतात. राजीला उचलून ते ऊसात नेतात, व तिच्यावर बलात्कार करतात. राजी नानांच्या वासनेची शिकार होते. आपल्या वासनेची भूक नाना भागवितात. तिचा उपभोग घेतल्यावर तिला उचलून विहिरीत टाकतात. अशा प्रकारे राजीच्या जीवनाचा शेवट होतो..

राजीचा बळी हा राजकारणातून झालेला असतो. राजीचा चुलता लकुळया ग्रामपंचायतीत सभासद असतो. लकुळयाची शीट देवाच्या बाजूची असते. लकुळयाची शीट आपल्या बाजूने येण्यासाठी नाना राजीचा शेवट करुन

त्यांच्यासमोर संकट उभे करतात. राजीचे प्रकरण मिटविण्यासाठी नाना पुढाकार घेतात. राजीला मूठमाती देण्याची गडबड करतात. लकुळ्या व त्याच्या भावाला पोलिसांची भिती घालतात. राजीच्या नवऱ्याला निरोप देण्यासाठी आपली बुलेट देतात. राजीच्या मयत प्रकरणामुळे लकुळ्या नानांच्या बाजूला येतो. केवळ लकुळ्याची शिट मिळविण्यासाठी नानाची ही राजकीय खेळी असते.

राजी तरूण होती. तिच्या उनाडपणामुळे गावातील उनाड मुले तिच्या पाळतीवर असत. परंतु ती शेवटी नानांच्या जाळ्यात सापडते. तिच्या जीवनाचा करूणाजनक शेवट होतो.

राजीची ही व्यक्तिरेखा परित्यक्तांचे जीवन उभे करते. नवऱ्याने सोडलेल्या स्त्रियांच्या भावनांचा कोंडमारा कसा होतो हे या व्यक्तिरेखेतून दिसते. गरीबीमुळे जीवन कसे उद्ध्वस्त होते हे जाणवते. असहाय्य अबला जीवन जगत असताना गावातील सत्ताप्रमुखाच्या वासनेच्या शिकार होतात. आणि त्यांच्या आयुष्याचा शेवट होतो.

राजकारणातील डावपेच लढवत असताना राजी नानांच्या जाळ्यात सापडते. नानांच्या वासनेचा व राजकारणाचा ती बळी ठरते.

३) <u>शाकीची आई :</u>

शाकीची आई म्हातारी आहे. ती विधवा झाल्यापासून मोलमजूरी करून आपल्या मुलाना मोठे करते. शाकी तिची एकुलती एक मुलगी असते. शाकीचा नवरा मरतो. आपल्याप्रमाणेच मुलीला विधवापण आल्याचे तिला पहावे लागते. मुलीच्या आयुष्याचे वाटोळे झालेले तिला पहावत नाही. शाकीच्या काळजीने ती अधिक खंगत जाते. मनाने आणि शरीराने खचत चाललेल्या म्हातारीचे चित्र रेखाटताना लेखक म्हणतात,

"नुकतं बसू लागलेलं मूल दोन्ही पाय पुढयात गोल करून बसतं तशी जाधवाची म्हातारी बसली होती. गुडघ्यापासून पावलापर्यंतचे तिचे पाय पिकल्या पडवळागत दिसत होते. डोळयावर आलेलं पांढ-या केसाचं जंजाळ हातान ढकलत ती रडव्या तोंडान माझ्याकडे पहात होती." (लिगाड,पृ.१५)

म्हातारीने आयुष्यभर जपलेली अब्रू मुलीच्या वागण्यामुळे जाते. त्यामुळे तिला अतिशय दु:ख होते. आपल्या मुलीचे नशीब असे वेगळे वळण घेईल हा विचार तिच्या स्वप्नांतसुध्दा कधी आला नाही. परंतु हे घडलेल पाहिल्यावर ती अधिक खंगत जाते.

"लिगाड" मधील ही व्यक्तिरेखा महत्त्वाची आहे. आयुष्यभर कष्ट उपसणा-या म्हातारीला अखेरपर्यंत सुख मिळत नाही. रूढ नैतिक परंपरा म्हातारीने जोपासलेली आहे. त्यामुळे आयुष्याच्या अखेरपर्यंत तिच्या वाटयाला निराशा येते. तिच्या जगण्यातला उत्साह संपतो.

४) <u>रघूची आई :</u>

रघूची आई शांत स्वभावाची व्यक्तिरेखा आहे. शेतकरी कुटुंबातील ही व्यक्तिरेखा शेतीशी एकजीव झालेली दिसते. आपल्या मुलानी भरपूर कष्ट करून शेती पिकवावी. कर्जातून मुक्त व्हावे, आणि सुखाने जीवन जगावे असे तिला सतत वाटत असते. त्यामुळे मुलाना सतत ती मदत करत असते. तिच्या नव-याचा स्वभाव तापट असतो. त्यांचे वागणे आणि विचार तिला पटत नाहीत. शेती व्यवसायातील अडचणी तिला माहित आहेत. त्यामुळे गावातील लोकाशी कसे वागायचे याची शिकवण ती मुलाना देते. ही व्यक्तिरेखा ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील स्त्रीचे जीवन प्रकट करते.

५) <u>लगम्याची बायको :</u>

लगम्या आणि त्याची बायको यांचे मूळ गाव कर्नाटकात असते. घरच्या गरीबीमुळे पोट भरण्यासाठी दोघे आलेले असतात. नानांच्या मळयात

अमतोडीसाठी ते येतात. लगम्याची बायको छिनाल असते. तिचा नखरेलपणा नाना हेरतात. तिला वश करतात. आठ दिवस तिला मळयात ठेऊन घेतात. लगम्याला हे समजल्यावर तो बायकोबरोबर भांडण करतो. काही दिवस ती तात्याजवळ राहते. एक दिवस दुस-याबरोबर ती पळून जाते.

नव-याच्या मलूल वागण्याचा ती फायदा घेते. नव-यापासून न मिळणारे समाधान ती इतरापासून मिळवत असते. तिच्या बाहेरख्याली वागण्यामुळे संसार उद्ध्वस्त होतो. अखेरपर्यंत कोणाजवळही ती टिकून राहत नाही. "लिगाड" मधील ही व्यक्तिरेखा बाहेरख्याली वागणा-या स्त्रीच्या जीवनाची कशी कुतरओढ होते याचे दर्शन घडविते.

६) <u>चंदा</u> :

चंदा ही दलित समाजातील आहे. गरीबीत जीवन जगत असते. दररोज गवताचा भारा आणून बाजारात विकते व आपला उदरनिर्वाह करते. चंदा एकगरीब शोषित स्त्री आहे. गवत विकले नाही तर तिला उपासपोटी रहावे लागते. चंदाच्या या दारिद्र्याकडे कोणाचेही लक्ष जात नाही. तुकाराम पाटलासारखा देवमाणूस तिचा गवताचा भारा विकत घेतो.

चंदा आपले दारिद्र्य उघडे करीत नाही. निमूटपणे ती जगत असते. "लिगाड"मधील ही व्यक्तिरेखा दलित समाजातील स्त्रियांचे दु:ख प्रकट करते. बदलत्या ग्रामीण परिसरात ग्रामीण विकासाच्या योजना दलित स्त्रियांच्या जीवनात काहीच परिवर्तन घडवून आणू शकत नाहीत. पिढयानपिढया अशा स्त्रियांना दरिद्री जीवन जगावे लागते याची जाणीव होते.

७) <u>भागिरथी</u> :

भागिरथी ही "खांदेपालट" मधील व्यक्तिरेखा आहे. त्या नानांच्या धर्मपत्नी आहेत. उंच शिडशिडीत अशी त्यांची शरीरयष्टी आहे.

भागिरथीबाईचा स्वभाव शांत आहे. त्या मर्यादशिल आहेत. कारण मुलाच्या लग्नाचा होकार घेण्यासाठी नाना त्यांना विचारतात त्यावेळी त्या उंब-याच्या आतूनच बोलतात.

भागिरथीला स्वत:चे अस्तित्व नाही. नानांच्या प्रतिष्ठेत त्यांना महत्व नाही. आपला मुलगा व्यसनाधिन होऊन वाया जात आहे हे सांगण्याचे धाडस त्यांना होत नाही. नानांच्या लपंट वागण्याला त्या विरोध करु शकत नाहीत. त्यांची प्रतिकारशक्ती दुबळी असते.

गावगाडयाची सत्ता भोगणा-या नानांची पत्नी यापासून दूर असते. त्यांना यामध्ये महत्व नसते. त्यामुळे त्यांना विचारांचे, वागण्याचे स्वातंत्र्य नसते. रूढ पारंपरिक चाकोरीत जीवन जगणारी ही व्यक्तिरेखा असल्याचे जाणवते.

८) फुलाबाई :

फुलाबाई ही "खांदेपालट" मधील व्यक्तिरेखा आहे. बाळकूची पत्नी असते. फुलाबाई थोंडीनानांच्या मळयात मोलमजूरी करुन जगते. एक दिवस तिचा नवरा नानांच्या विहिरीत राजीचे प्रेत पाहून येतो. फुलाबाईला हे सांगितल्यावर भीतीने तिला धक्का बसतो. राजीच्या घाणेरडया वागण्याचा ती तिरस्कार करते. राजीच्या मृत्यूचा विचार करत बसते.

या व्यक्तिरेखेतून सामान्य स्त्रियांच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. बाहेरख्याली वागणा-या राजीविषयी व्यक्त झालेल्या सामान्य स्त्रियांच्या भावना बोलक्या आहेत. सामान्य स्त्रियांचे दर्शन या व्यक्तिरेखेतून होते.

१०४ सामान्य माणसांचे प्रतिनिधित्व करणा-या व्यक्तिरेखा :

"लिगाड" आणि "खांदेपालट" या दोन्ही कादंब-यात काही सामान्य

व्यक्तिरेखा आल्या आहेत. या व्यक्तिरेखांच्या स्वभाववैचित्र्यामुळे प्रमुख व्यक्तिरेखाना उठावदारपणा आला आहे. या व्यक्तिरेखातून सामान्य माणसांच्या जीवनाचे स्वरूप समजून येते. समाजात या व्यक्तिना काही अस्तित्व नसते. सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा यापासून या व्यक्तिरेखा अलिप्त आहेत. गावातील सर्व भानगडी याना माहिती असतात. परंतु विरोध करण्याचे धाडस त्यांच्याजवळ नसते.

या व्यक्तिरेखांची प्रतिकारशक्ती दुबळी आहे. आपल्यावर होणारा अन्याय निमूटपणे सहन करतात. जीवनातील अनेक संकटाला तोंड देतात. त्यांचे जीवन अस्तित्वहीन असल्याचे जाणवते. अशा व्यक्तिरेखांचे जीवन आपणाला समजावून घ्यायचे आहे.

१) <u>बापू:</u>

बापू हे रघूचे वडिल आहेत. ते गावातील जून्या रूढी परंपरेशी चिकटून असतात. गावातील भानगडीचे लिगाड लावून घ्यायचे त्यांना आवडत नाही. आपण आपले काम एवढे मर्यादित जीवन जगत असतात. गावातील भानगडी-चा ते कधी विचार करीत नाहीत. अलिप्तपणे ते जीवन जगतात.

दाजीतात्यांच्या कारस्थानाविषयी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करीत नाही. त्यांचा मुलगा रघू एक दिवस त्यांना तात्यांच्या भानगडी विषयी विचारतो. त्यावेळी ते रागावतात. व रघूला म्हणतात, "रघ्या..., जीभ हासडून दीन गड्डयातनं पुनां असं बोल्लास तर. सांगून ठेवतो. तेंचं ते हाळ हिरीत पडू द्यात. तुला का पंच्याती ही ? तुला हितं ऱ्हायाच आसंल तर गप्प गुमान ऱ्हा. न्हाई तर सूट तुझ्या नोकरीकडं." (लिगाड, पृ.२०)

बापूंच्या या बोलण्यातून त्यांचा तापट स्वभाव जाणवतो. त्याच-बरोबर गावातील सत्ताप्रमुखाला विरोध करण्याचे धाडस त्यांच्याजवळ नाही

हे स्पष्ट दिसते. बापू जातीला चिकटून असतात. आपल्या जातीविषयी, वागण्याविषयी त्यांना अभिमान आहे. आपण एकतरी जातीवंत मराठा घडवण्याचा प्रयत्न केला याचे त्यांना समाधान वाटते. रघू बजरंगाच्या घरी जातो हे त्यांना पटत नाही. भावकी आपले घर वाळीत टाकतील याची त्यांना भिती वाटते. ते नैतिकता जोपासतात. आपण जातीवंत आहोत असे त्यांना वाटते.

बापू ही सामान्य शेतकरी कुटुंबातील व्यक्तिरेखा आहे. अशा व्यक्ती गावातील भानगडीपासून दूर आहेत. बापूसारखे कितीतरी सामान्य शेतकरी अलिप्तपणे जीवन जगतात. गावातील सत्ताप्रमुखाला विरोध करण्याचे धाडस त्यांच्याजवळ नसते. अन्याय निमूटपणे सहन करीत ही माणसे जीवन जगताना दिसून येते.

२) <u>लगम्या :</u>

लगम्याची व्यक्तिरेखा ही "लिगाड" कादंबरीतील आहे. तो विजापूरकडून ऊसतोडीसाठी बायकोसह आलेला असतो. ऊसाची तोड तात्यांच्या मळयात चाललेली असते. लगम्याची बायको बाहेरख्याली असते. लगम्याला बायकोच्या वागण्याचा संशय येतो. दोघांचे भांडण होते. त्यांची बायको काही दिवस दाजीतात्याजवळ रहाते. एक दिवस त्यांच्याजवळूनही पळून जाते. लगम्याला तात्याने मळयात चाकरीला ठेवलेले असते. तो तात्यांच्या मळयाची राखण करीत असतो.

लगम्या स्वभावाने मलूल असतो. तात्या त्याचा संसार उद्ध्वस्त करतात. तात्यांचा सूड उगविण्याची ताकद त्याच्याजवळ नसते. तो तात्याच्या विहिरीचे पाणी चोरून विकतो व बदला घेतो.

लगम्याच्या जीवनाची अशी चित्तरकथा झालेली असते. तात्यांच्या

वागण्याविषयी त्यांच्या मनात संताप असतो. परंतु तो दुबळा असतो. लगम्या जवळ प्रतिकारशक्ती नाही. तात्यांच्या भानगडीविषयी दुस-याचे बोलणे ऐकूण त्याला समाधान वाटते. त्याला मालकाचा राग येत नाही. कारण त्याच्याही मनात मालकाविषयी असाच संताप असतो.

लगम्या तात्यांच्या विहिरीचे पाणी चोरून विकतो. तात्यांचा मुलगा बाजीरावला तो सापडतो. शिवाकडून भरपूर मार खातो. लगम्या ही सामान्य माणसांचे जीवन चित्रित केलेली व्यक्तिरेखा आहे.

बायकोच्या छिनाल वागण्यामुळे त्याच्या जीवनाची दुर्दशा होते. त्याचे जीवन मातीमोल होते. त्याच्या जगण्याला काहीच अर्थ रहात नाही. मातीमोल जीवन जगणारी माणस कशी ध्येयशून्य असतात हे यातून दिसते. लगम्याची व्यक्तिरेखा सामान्य माणसाच्या जीवनाची चित्तरकथा सांगणारी व्यक्तिरेखा आहे.

३) राऊ पाटील :

राऊ पाटील ही लिगाडमधील व्यक्तिरेखा आहे. दाजीतात्यांचे ते साथीदार आहेत. तात्या सांगतील त्याप्रमाणे ते वागतात. त्यांना स्वत:चे अस्तित्व नसते. तात्यांच्याबरोबर राहून स्वत:चा फायदा करून घेतात. तात्यांचे मोठेपण लोकाना सांगण्याचे काम करतात. रघूच्या ऊसाचे पाणी आडविल्यावर ते रघूला सल्ला देताना म्हणतात,

"रघू, तू शिकलास. पर तुला काडीचा येव्हार न्हाई. शान्या, असं नेमावर बॉट ठिवून बसायला ही शाळा हाय व्हंय ? उठ खुळ्या. आत तात्या बसल्यात, त्येंच्या कानांवर घाल ही गोष्ट. एक चिठ्ठी देत्याल एक मिण्टात मोकळा हुतोय पाट. तू का परका हाईस, आं ?" (लिगाड,पृ.११)

राऊ पाटलांच्या या बोलण्यावरून तात्यांना किती प्रतिष्ठा आहे, हे

लोकाना पटवून देण्याची त्यांची पध्दत जाणवते. सत्तेच्या जोरावर ही माणस नियमबाह्य वागतात. समाजातील विरोध मोडून काढतात. बदला घेण्यांची यांची वृत्ती आहे. तात्यांना विरोध करणाऱ्या माणसाची ते मानहानी करतात. तात्यांच्या हातात सारी सत्ता आहे हे लोकाना दाखवून देतात. "लिगाड" मधील ही व्यक्तिरेखा अस्तित्वशून्य आहे.

४) <u>भुई गणपा :</u>

"लिगाड" मधील ही व्यक्तिरेखा वेगळया स्वभावाची आहे. तो गावातील सामान्य माणूस आहे. गावात कुठलाही कार्यक्रम असो, भुईगणपा सर्वांच्या अगोदर कार्यक्रमाला हजर असतो. नाटक, तमाशा असो, किंवा फिरता सिनेमा असो. गणपा कार्यक्रमाला सर्वांच्या पुढे फेटा बांधून बसत असे. गावातील मुले त्यांची टवाळी करीत असत. तरीसुध्दा गणपा शांत असे. कोणताही कार्यक्रम असो तो मन लावून ऐकत असे. मान डोलावून कार्यक्रमाला दाद देत असे. त्याच्याजवळ बसलेली मुले त्याला विचारीत, "असे काय गणपा ! भुई धरून बसलास म्हणा ? तर गणपा शांतपणे त्यांना म्हणत असे होय बाबानू एवढच उत्तर देत असे.

भुई गणपा शांत पुरुष आहे. कोणालाही न बोलता कार्यक्रम संपला की घराकडे जाणार. तो एका जागेवर बसलाकी लवकर उठत नसे. म्हणून लोक त्याला भुई गणपा म्हणत असत. "लिगाड"मधील ही व्यक्तिरेखा वेगळे वैशिष्ठ्ये दाखवते.

५) <u>रामभाऊ गावडे :</u>

रामभाऊ गावडे ही "खांदेपालट" मधील व्यक्तिरेखा आहे. धोंडीनानांचे ते जवळचे सहकारी असतात. रामभाऊंचा स्वभाव नंदीबैलासारखा असतो. नाना म्हणतील त्याप्रमाणे होकार देण्याशिवाय दुसरे काहीच बोलत नाहीत.

रामभाऊना नाना राजकारणातील साथीदार म्हणून मानतात. नानांच्या स्वार्थी वागण्याचा त्यांना कंटाळा आलेला असतो. परंतु नानाला ते विरोध करु शकत नाहीत. त्यांचे व्यक्तिमत्व दुबळे असते. आपला दुबळेपणा व्यक्त करताना ते म्हणतात,

" खरं म्हणीला देवा तर ह्या राजकारणाचा म्ला कावकिक्क आलाय बघा. गाव सोडून जावं नि कुठंतरी लांब तिकडं आटंग्याबनात खोपाट बांधून -हावं असे वाटतंया मला बी. रोज हैची खेकटी." (खांदेपालट, पृ६१)

रामभाऊचे वागणे दुटप्पी असते. नानांच्या संगतीने जेवढा फायदा उठविता येईल तेवढा उठविण्याचा प्रयत्न करतात. नाना अडचणीत येतील त्यावेळी त्यांना सल्ला देण्याचे काम करतात. गावच्या राजकारणात ते असून नसल्यासारखे असतात. आपले घरदार शेती सांभाळून राजकारणात भाग घेतात. राजकारणाविषयी आपले मत व्यक्त करताना ते म्हणतात, "आवो वेसवा बायागत हे पुढारपण, पैशाला पासरी." (पृ. ६२)

रामभाऊना राजकारणाचा उत्साह नसतो. परंतु नानांची संगत त्यांना सोडता येत नाही. रामभाऊची ही व्यक्तिरेखा व्यक्तिमत्व नसलेली व्यक्तिरेखा आहे. अडचणीच्या वेळी ते नानांला मदत करतात. नानांचा मुलगा वाया गेल्यावर त्यांना सावध करतात. राजीच्या मृत्यूचे प्रकरण मिटविण्यासाठी रामभाऊचा पुढाकार असतो.

६) <u>लकुळ्या</u> :

लकुळ्या हा चांभार समाजाचा पुढारी असतो. तो ग्रामपंचायतीत सभासद असतो. लकुळ्याची शिट पंचायतीत देवाच्या बाजूने असते. लकुळ्याचा पाठिंबा आपल्याला मिळावा म्हणून नाना त्याच्या भावाच्या मुलीला मारून विहिरीत टाकतात. पोलीसाची भिती घालून ते प्रकरण मिटवतात व लकुळ्या नानाच्या बाजूने जातो.

नानांचा राजकीय डावपेच लकुळ्याला माहित असतो. परंतु नानांला विरोध करण्याची ताकद त्याच्याजवळ नसते. नानाला विरोध केलातर आपले ऊसाचे पिक जाळणार, नाना आपल्याला त्रास देणार याची भिती त्याला वाटत असते. गावातील सत्ताप्रमुख लकुळ्यासारख्या अल्पसंख्याक माणसाला त्रास देऊन त्याचा वापर राजकारणासाठी करुन घेतात.

७) रामा चांभार :

रामा चांभार हा राजीचा बाप आहे. तो नानांच्या मळ्यात मोल-मजूरी करुन जगत असतो. गरीब परिस्थितीमुळे तो जावयाचा लाड पुरवू शकत नाही. त्यामुळे राजीला घरी ठेऊन घेतो. राजीच्या अचानक मृत्यूमुळे त्याच्या समोर संकट उभे रहाते. तो हतबल होतो. नानाने आपल्या मुलीला मारले हे त्याला माहित असते. तरीपुध्दा हे प्रकरण मिटविण्यासाठी तो नानाकडे येतो.

उघडपणे बोलण्याचे धाडस त्याला होत नाही. आपल्यावर झालेला अन्याय तो निमूटपणे सहन करतो. रामाची ही व्यक्तिरेखा शोषित जीवन जगणाऱ्या सामान्य माणसांच्या जीवनाचे प्रतिनिधित्व करते.

१.५ इतर व्यक्तिरेखा :

"लिगाड" आणि "खांदेपालट" या दोन लघुकादंबऱ्यात काही व्यक्ति-रेखांचा स्वभावपरिचय अल्पसा आला आहे. कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखाना उठावदारपणा प्राप्त होण्यासाठी या व्यक्तिरेखा आल्या आहेत. कादंबरीच्या कथानकात या व्यक्तिरेखाना गौण स्थान आहे. परंतु यांच्यामुळे कादंबरीच्या कथानकाला सलगता आली आहे. कथानकाला जीवंतपणा आणि वास्तवता आणण्यासाठी या व्यक्तिरेखा वैशिष्टयपूर्ण आहेत.

या व्यक्तिरेखांचा परिचय अल्पसा का असेना करुन घेणे गरजेचे आहे. या व्यक्तिरेखा ग्रामीण भागातील बदलत्या जीवनातील माणसांच्या स्वभावाचे

विविध नमूने आहेत. म्हणून त्यांचा स्वभाव परिचय करून घ्यावयाचा ठरविला आहे. यासाठी इतर व्यक्तिचित्रणाचा अभ्यास करणे महत्त्वाचे वाटते.

१) बाबासाब :

बाबासाब "दाजीतात्यांचा धाकटा मुलगा आहे. तात्यासारखी मग्रूरी त्याच्याजवळ आहे. बाबासाबला श्रीमंतीची घमेंड असते. बापाच्या संपत्तीवर तो चैनित जीवन जगतो. मनगटाच्या जोरावर गरीबाना त्रास देण्याची अडचणीत आणण्याची त्याची वृत्ती असते. शिवाआणि त्याचे भांडण होते. शिवा त्याचा ट्रॅक्टर अडवितो. त्याचा बदला म्हणून तो शिवाच्या ऊसाचे पाणी आडवतो. डावाला डाव देण्याची त्याची वृत्ती आहे. डावपेच आणि बदला घेऊन भरपाई झाल्याचे समाधान मिळविण्यासाठी खुनशीपणाने वागण्याची वृत्ती बापापासून आलेली असते.

बाबासाबची व्यक्तिरेखा ऐश्वर्यसंपन्न बापाच्या संपत्तीचा उपभोग घेणारी आहे. स्वत:च्या जीवनाविषयी विधायक विचार त्याच्याजवळ नाहीत.

२) मगदूम सेक्रेटरी :

"खांदेपालट" मधील ही व्यक्तिरेखा आहे. मगदूम पाणीसोसायटीत सेक्रेटरी असतो. मगदूमला सेक्रेटरी पद दिल्यामुळे जैन समाजाचा पाठिंबा नानाला मिळालेला असतो. परंतु मगदूमाचे हे पद नावापुरतेच असते. सोसायटीचे सारे अधिकार नानाकडे असतात. मगदूम फक्त कारकूनाचे काम करतो. मगदूमाला सोसायटीत कसल्याही प्रकारचे स्वातंत्र्य नसते. नाना सांगतिल त्याप्रमाणे तो वागत असतो. याना स्वत:चे अस्तित्व नसते.

३) मानसिंगराव :

मानसिंगराव दाजीतात्यांचा थोरला मुलगा आहे. त्याला दारूचे व्यसन असते. दिवसभर तो हातभट्टीची दारू पिऊन माळरानावर लोळत पडलेला असतो.

त्याचे वडिल तात्या आपल्या प्रतिष्ठेसाठी त्याचा आदर्श शेतकरी म्हणून सत्कार समारंभ घडवून आणतात. मानसिंगराव कधी शेतात जात नाही. काम करत नाही. त्याला पीकपाण्याविषयी फारसी माहिती नसते. तरी त्याचा सत्कार घडवून आणला जातो. बापाप्रमाणे मोठेपणा मिळविण्याची हौस याना असते. ही व्यक्तिरेखा स्वत:च्या जीवनात काही निर्माण करू शकत नाही.

४) <u>लक्सू</u> :

लक्सू हा पाणीसोसायटीत पाटक-याचे काम करतो. पाटाचे पाणी नंबराप्रमाणे शेतक-याना देणे हे त्याचे काम असते. परंतु लक्सूला सर्वजन गुलामाप्रमाणे वागवतात. शेतक-याना पाणी नंबराप्रमाणे दिले नाहीतर त्याला मार खावा लागतो. धोंडीनानाला तो घाबरतो. नानासमोर बोलण्याचे त्याला धाडस होत नाही. त्यांच्या जीवनाला जगण्याला काही मोल नसते. त्याला स्वत:चे अस्तित्व नाही. लाथेच्या चेंडूप्रमाणे प्रत्येकजण लाथाडत असतो.

५) <u>बबन</u> :

बबन हा दाजीतात्यांच्या मळयात कामाला असतो. तात्यांच्या मळयात कपडी धुण्यासाठी शकू येत असते. शकूबरोबर त्याचे संबंध जुळतात. दोघानी पळून जायचे ठरविलेले असते. दोघानी लग्न करून नव्याने संसार उभा करावयाचा निश्चय केलेला असतो. परंतु तात्या शकीला फसवतात. तिच्यावर बलात्कार करतात व आपले कारस्थान उघडे पडू नये म्हणून बबनचे नाव सांगतात. बबनच्या नावाची गावात आफवा उठते. शकीवर होणारा बलात्काराचा प्रसंग चित्रित करण्यासाठी बबनच्या व्यक्तिरेखेचा आधार घेतलेला आहे. यामुळेच तो प्रसंग उठावदार झाला आहे.

६) रामराव पाटील :

रामराव पाटील ही "खांदेपालट" मधील व्यक्तिरेखा आहे. तो ग्रामपंचायतीत सदस्य असतात. पंचायतीत नानांच्या डावपेचाच्या राजकारणापुढे त्यांचे काही चालत नाही. नानांच्या बेरकीपणामुळे त्यांना बोलण्याचे धाडस होत नाही. गावाच्या विकासाचा ते कधी विचार करीत नाहीत. वरवरपणे नानाला पाठिंबा देतात. परंतु नानाविषयी संताप असतो. याना स्वत:चे अस्तित्व नाही.

७) गजा आणि रामा :

गजा आणि रामा या "लिगाड" मधील व्यक्तिरेखा आहेत. हे दोघे भाऊ आहेत. सामान्य शेतकरी कुटुंबातील हे तरूण आहेत. गावातील भानगडीपासून, राजकारणापासून अलिप्त असतात. दाजीतात्यांचे वागणे त्यांना माहित असते. परंतु त्यांच्या विरोध बोलण्याचे धाडस ते करत नाहीत. दाजीतात्यांना विरोध केलातर आपले नुकसान करतील अशी भिती त्यांना वाटत असते. फक्त आपल्या कामापुरता ते इतराशी संबंध ठेवतात. अपमतलबी स्वभावाच्या या व्यक्तिरेखा आहेत.

८) कोळयाचा बाळकू :

बाळकू ही गरीब कुटुंबातील व्यक्ती आहे. धोंडीनानांच्या मळयात मोलमजूरी करून तो जगत असतो. एक दिवस नानांच्या मळयात अंघोळीला गेल्यावर त्याला विहिरीत राजीचे प्रेत दिसते. तो घाबरतो. भितीने त्याच्या अंगाचा थरकाप होतो. घरी आल्यावर त्याला चैन पडत नाही. ही गावातील बातमी तो गावातील लोकाना सांगतो.

बाळकूची ही व्यक्तिरेखा राजीच्या मृत्यूची बातमी गावात पोहचविण्यासाठी आलेली आहे.

९) अशोक आणि दिनकर :

अशोक आणि दिनकर या "खांदेपालट" मधील व्यक्तिरेखा आहेत. ही तरूण मुले गावात टवाळी करीत फिरत असतात. रात्रभर देवळाच्या माडीवर पत्ते खेळत असतात. गावातील अनेक भानगडीची चर्चा करीत असतात. नानांच्या वाडयातील गोंधळ ऐकूण राजीच्या मृत्यूची बातमी त्यांना समजते. ती बातमी गावभर पोहचविण्याचे काम ते करतात.

स मा रो प :

मोहन पाटील यांच्या "लिगाड" आणि "खांदेपालट" या लघु कादंब-यातील व्यक्तिरेखांचा अभ्यास करताना या व्यक्तिरेखा वैशिष्टयपूर्ण असल्याचे जाणवते. बदलत्या ग्रामीण जीवनाचे केंद्रस्थान बदलल्यामुळे सत्तास्थानही बदलले आहे. गावगाडयाची सत्ता सहकारातील प्रमुख व्यक्तिच्या हाती केंद्रित झालेली दिसते.

दाजीतात्या आणि धोंडीनाना या व्यक्ती प्रमुख सत्ताधिश आहेत. ग्रामीण समाजावर आपली अनिर्बंध सत्ता गाजवित असतात. त्यांच्या वागण्यातील बेरकीपणा, बेमुर्वतपणा, डावपेच, यामुळे ही माणस आपल्या जीवनात अस्थिर झाली आहेत. जगण्यातील खोटेपणा लपविण्यासाठी यांची सतत धडपड चाललेली दिसते. जगण्यातील खोटी प्रतिष्ठा जपण्याचा त्यांचा सतत प्रयत्न चालू असतो.

दाजीतात्या आणि धोंडीनानासारख्या सत्ताप्रमुखाना जीवनात धड खरेपणाने जगता येत नाही आणि खोटेपणाही लपवता येत नाही. त्यामुळे जीवनालाच दुभंगलेपण आले आहे. यांच्या ऐश्वर्यसंपन्न जीवनाला किड लागलेली असते. आपल्याप्रमाणे ते मुलाना घडवू शकत नाहीत हा त्यांच्या जगण्यातला पराभव आहे. धोंडीनानाच्या गो-यापायावरील इसबाचा काळा डाग जीवनातील

ओढ्टीची जाणीव करुन देतो. त्यांचे वागणे स्वप्रवृत्तीचे असते. म्हणून त्यांना दुभंगलेपणा आलेले आहे.

या कादंबऱ्यातील काही व्यक्तिरेखा महत्त्वाच्या आहेत. तरी काही केंद्रिभूत आहेत. या व्यक्तिचित्रणामुळे कादंबरीच्या कथानकाला उठावदारपणा आलेला आहे. या व्यक्तिंच्या वागण्याची विविध वैशिष्ट्ये जाणवतात. रघू हा"लिगाड" कादंबरीचा नायक आहे. रघू, शिवा, बजरंग, देव या व्यक्ति-रेखा विकसीत आहेत. जीवनात खरेपणाने जगण्याची त्यांची धडपड चाललेली असते. स्वत:बरोबर समाजाचाही विकास व्हावा असे त्यांना वाटत असते. त्या-मुळे समाजाची पिळवणूक करणाऱ्या सत्ताप्रमुखाविरुध्द ते वागतात. समाजाकडून याना पाठिंबा मिळत नाही. सत्ताप्रमुख यांच्या जीवनात अनेक अडचणी निर्माण करतात. यांचे मानसिक, शारीरिक, आर्थिक खच्चीकरण करण्याचा सतत प्रयत्न करतात. गावातील लोकांचा याना पाठिंबा मिळत नाही. त्यामुळे त्यांची प्रतिकार शक्ती दुबळी ठरते. या संघर्षात त्यांच्या मनाची संतत घुसमट होत राहते.

या कादंबऱ्यात काही स्त्री व्यक्तिरेखा आल्या आहेत. त्यामध्ये विधवा, परित्यक्ता, हीनाल, दलित, शोषित जीवन जगणाऱ्या दर्शन होते. या स्त्रिया गावातील सत्ताप्रमुखाच्या वासनेच्या शिकार बनल्या आहेत. मातीमोल जीवन जगण्याचे दुर्भाग्य यांच्या नशिबी आलेले आहे. यामुळे स्त्रियांच्या भावनांचा सतत कोंडमारा झालेला दिसतो. आपल्या भावनाना वाट मोकळी करुन देण्याचा प्रयत्न करीत असताना यांचे जीवन उद्‌वस्त झालेले दिसते. शेवटी त्यांच्या आयु-ष्याचा शेवट होतो.

या स्त्रियांच्या जीवनाचे स्वरुप पारंपरिक आहे. समाज बदलला तरी विधवा, परित्यक्ता यांच्या जीवनातील दु:खाचे स्वरुप बदलले दिसत नाही. उलट ते वेगळ्या स्वरुपात प्रकट झालेले दिसते. शकूसारखी तरुण विधवा पुन्हा लग्न

करून संसार उभा करण्याचे स्वप्न बाळगते. हा विचार तीच्या विधवा आईला आवडत नाही. दलित स्त्रियांच्या जीवनातील दु:ख, दारिद्र्य कमी झाल्याचे दिसत नाही. चंदाच्या व्यक्तिरेखेतून दलित जीवनाचे चित्र स्पष्ट होते. भागिरथी-सारखी स्त्री किंवा रघूची आई या स्त्रिया कुटुंबाशी एकजीव झाल्या आहेत. परंतु घराच्या बाहेर याना महत्व नाही. अन्याय, अत्याचार निमूटपणे सहन करीत शोषित जीवन जगणाऱ्या या व्यक्तिरेखा आहेत.

काही व्यक्तिरेखा सामान्य माणसाच्या जीवनाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आहेत. ग्रामीण भागात विकासाच्या अनेक सोयी आल्या. तरी सामान्य माणसाच्या जीवनात फारसा बदल झालेला जाणवत नाही. गावातील सत्ता-प्रमुखाच्या दबावाखाली ही माणस जीवन जगताना दिसतात. गावच्या राज-कारणाविषयी याना स्वारस्य नसते. गावातील सत्ताप्रमुखानी यांची प्रतिकार शक्ती दुबळी केलेली असते. त्यामुळे अन्याय निमूटपणे सहन करीत जीवन जगताना दिसतात. सामान्य शेतकऱ्यांच्या जीवनात गावातील सत्ताप्रमुख सतत अडचणी आणतात. त्यांची सतत पिळवणूक होते. त्यांच्या शेतीला वेळेवर पाणी मिळत नाही. खत मिळत नाही. त्यांचे सतत आर्थिक, शारीरिक, मानसिक शोषण होत असल्याचे दिसते. गावातील राजकारणामुळे या लोकांच्या जीवनात नवे संघर्ष उभे राहिल्याचे दिसते.

गावातील सत्ताप्रमुख सर्वांचे जीवन अस्थिर करून टाकतात. जातीजातीत भांडण, भावाभावात भांडण, माणसामाणसात वैर निर्माण करून आपला राजकिय स्वार्थ साधण्याचा प्रयत्न सत्ताप्रमुखाने केलेला दिसतो. त्यामुळे गावात दुफळी निर्माण होऊन सामान्य माणसाच्या जीवनात ताणतणावे निर्माण झालेले दिसतात.

या कादंबऱ्यात काही व्यक्तिरेखांचा अल्पसा परिचय आलेला दिसतो. कादंबरीच्या कथानकाला सलगता व उठावदारपणा आणण्यासाठी या व्यक्ति-रेखा महत्त्वाच्या आहेत. कथानकातील अनेक घटना व प्रसंग या व्यक्तिचित्रामुळे

जीवंत साकार झालेले दिसतात. तरीही या व्यक्तिरेखांचे अस्तित्व कादंबरीत जाणवते. कथानकाचे स्वरूप पाहताना या व्यक्तिरेखा गरजेच्या वाटतात. या व्यक्तिरेखांच्या स्वभावाचे विविध नमूने जाणवतात. त्यामुळे बदलत्या ग्रामीण जीवनावर प्रकाश पडतो.

.....

## प्रकरण तिसरे

## संदर्भसूची


१) कुरुंदकर नरहर - "धार आणि काठ", पुणे, देशमुख आणि कंपनी, प्र.आ. १९७५, पृ. १६०.

२) बापट, गोडबोले - "मराठी कादंबरी तंत्र आणि विकास", व्हीनस प्रकाशन, पुणे, तृ.आ. १९७३, पृ. ११२.

३) बांदिवडेकर, चंद्रकांत - "मराठी कादंबरीचा विकास", व्हीनस् प्रकाशन, पुणे, तृ.आ. १९७३, पृ. ११४.

४) तत्रैव, पृ. १३३.

५) बापट गोडबोले - "मराठी कादंबरी तंत्र आणि विकास", व्हीनस प्रकाशन, पुणे, तृ.आ.१९७३, पृ. ११४.

६) तत्रैव, पृ. ११४.

७) तत्रैव, पृ. ११९.


........